cmyk

## संपादकीय

### कर्जावर चालणारा मध्यमवर्ग, थांबलेली रोजगारनिर्मिती आणि सरकारची विकासकथा

एकेकाळी ''आधी बचत, मग खर्च'' हे भारतीय मध्यमवर्गाचे आर्थिक तत्त्वज्ञान होते. आज परिस्थिती उलटी झाली आहे. ''आधी कर्ज, मग खर्च'' हीच अनेक कुटुंबांची जीवनशैली बनत चालली आहे. ही केवळ आर्थिक सवय बदलल्याची गोष्ट नाही; ती देशाच्या अर्थव्यवस्थेसाठी आणि सामाजिक स्थैर्यासाठी गंभीर इशारा आहे. मार्सेलम इन्व्हेस्टमेंट मॅनेजर्सचे संस्थापक सौरभ मुखर्जी यांनी मांडलेल्या विश्लेषणानुसार, भारतातील घरगुती कर्जाचे उत्पन्नाशी असलेले प्रमाण ३२ टक्क्यांपर्यंत पोहोचले आहे.

दैनिक

www.epaper.rajyaloktantra.com

# राज्य लोकतंत्र

नवी दिशा... नवे विचार.....

● छत्रपती संभाजीनगर ● पुणे ● अहिल्यानगर ● जालना ● धाराशिव जिल्ह्यात वितरीत होणारे दैनिक

बीड – महाराष्ट्र | वर्ष–६ | अंक–११८ | शनिवार दि.१८ जुलै २०२६ | RNI No.: MAHMAR/2021/858 | NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 | पाने–६ | किंमत ३ रूपये

## थोडक्यात...

### देशातील पहिली हायड्रोजन ट्रेन सुरू

नवी दिल्लीः पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी शुक्रवारी देशातील पहिल्या हायड्रोजन ट्रेनला हिरवा झेंडा दाखवून रवाना केले. ही ट्रेन जींद ते सोनीपत दरम्यान धावली. यासोबतच, हायड्रोजन इंधनावर चालणारी ट्रेन सुरू करणारा भारत जगातील पाचवा देश बनला आहे. यापूर्वी जर्मनी, फ्रान्स, स्वीडन आणि चीनमध्येच हायड्रोजन ट्रेन्स धावत आहेत. पंतप्रधान मोदी म्हणाले जींद–सोनीपत दरम्यान धावणारी ही ट्रेन जगातील सर्वात शक्तिशाली हायड्रोजन ट्रेन आहे. या ट्रेनची रचना भारतातील अभियंत्यांनी केली आहे आणि भारतातीलच कंपनीने ती बनवली आहे. १० डब्यांची ही ट्रेन जींद–सोनीपत मार्गावर १४ स्थानकांदरम्यान जास्तीत जास्त ७५ किमी प्रति तास वेगाने धावेल. याचे भाडे ५ ते २५ रुपयांच्या दरम्यान ठेवण्यात आले आहे. ट्रेन ८९ किलोमीटरचा प्रवास सुमारे २ तासांत पूर्ण करेल. पंतप्रधान मोदींनी एलिव्हेटेड रेल्वे ट्रॅक, दोन वैद्यकीय महाविद्यालयांसह ८ प्रकल्पांचे उद्घाटन आणि पायाभरणी देखील केली.

### आंध्र प्रदेशात कोरोनाच्या रुग्णांत वाढ

कडप्पाः आंध्र प्रदेशमध्ये कोरोना हातपाय पसरत आहे. राज्याचे आरोग्य आयुक्त जी. वीरपांडियन यांनी माहिती दिली आहे की, २६ जून ते १६ जुलै दरम्यान कोरोनाचे १२ रुग्ण आढळले आहेत. त्यामुळे याचा प्रसार वाढू नये, यासाठी योग्य त्या उपाययोजना करण्यात येत आहे. २६ जून ते १६ जुलै दरम्यान आंध्र प्रदेशात कोरोनाचे १२ नवीन रुग्ण आढळले, त्यापैकी चार रुग्णांचा मृत्यू झाला. सर्व मृत रुग्णांना आधीपासूनच काही आजार होते. सर्वाधिक रुग्ण कडप्पा जिल्ह्यात आढळले. कडपा येथील रिम्स रुग्णालयात एक कोविड वॉर्ड आणि विलगीकरण कक्ष उभारण्यात आला आहे. मृत्यू झालेल्या चार रुग्णांना उच्च रक्तदाब, मधुमेह आणि मूत्रपिंडाचा आजार यांसारखे आधीपासून असलेले आजार होते. यापैकी तीन रुग्ण कडपा जिल्ह्यातील आणि एक काकीनाडा येथील होता. आंध्र प्रदेशातील २०२६ मधील पहिला कोरोना रुग्ण २६ जून रोजी कडप्पा जिल्ह्यात आढळला. त्यानंतर, १ ते १६ जुलै दरम्यान आणखी ११ रुग्ण आढळले.

### मणिपूरमध्ये सिद्धिविनायक मंदिराची प्रतिकृती उभारणार

इंफाळः महाराष्ट्र सदनात आयोजित 'ईशान सेतू सांस्कृतिक एकात्मता व राष्ट्रनिर्माण' सोहळ्यात उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी भारताच्या सांस्कृतिक ऐक्याचा, राष्ट्रीय समरसतेचा आणि ईशान्य भारताशी आत्मीय नाते दृढ करण्याचा ठाम संदेश दिला. परमपूज्य राष्ट्रऋषी स्वामी गोविंददेव गिरी महाराज, केंद्रीय गृहमंत्री अमित शाह, स्वतंत्र देव सिंह, विविध राज्यांतील लोकप्रतिनिधी, राष्ट्रीय स्वयंसेवक संघ, विश्व हिंदू परिषद, सामाजिक–सांस्कृतिक संस्थांचे प्रतिनिधी उपस्थित होते. ईशान्य भारतावरील प्रेम व्यक्त करताना एकनाथ शिंदे यांनी काव्यपंक्ती सादर केल्या आणि महाराष्ट्राचे आराध्य दैवत मुंबईच्या श्री सिद्धिविनायक मंदिराची भव्य प्रतिकृती लवकरच मणिपूरमध्ये उभारली जाणार असल्याची महत्त्वपूर्ण घोषणा केली. श्री सिद्धिविनायकाच्या कृपेने हे मंदिर महाराष्ट्र आणि ईशान्य भारत यांच्यातील धार्मिक, सांस्कृतिक आणि भावनिक नात्याचा मजबूत 'ईशान सेतू' ठरेल, असा विश्वास व्यक्त केला.

# सोयाबीन बियाण्यांची उगवणच नाही !

## महाबीजसह १३ कंपन्यांविरोधात ४६८ तक्रारी

पुणे । प्रतिनिधी

**एल निनोच्या प्रभावामुळे पावसाच्या अनियमिततेने आधीच खरीप हंगाम संकटात सापडला असताना आता सोयाबीन बियाण्यांची उगवण न झाल्याने शेतकऱ्यांवर दुहेरी संकट ओढवले आहे. सरकारी मालकीच्या महाबीजसह १३ कंपन्यांच्या सोयाबीन बियाण्यांबाबत मोठ्या प्रमाणावर तक्रारी दाखल झाल्या असून, लातूर विभागातील पाच जिल्ह्यांत आतापर्यंत ४६८ तक्रारी नोंदविण्यात आल्या आहेत.**



लातूर विभागात सर्वाधिक २६२ तक्रारी महाबीजच्या बियाण्यांबाबत असून, एकट्या लातूर जिल्ह्यात १७१ तक्रारींपैकी १०४ तक्रारी महाबीजच्या बियाण्यांविरोधात आहेत. नांदेडमध्ये १९४, लातूरमध्ये १७१, धाराशिवमध्ये ४९, परभणीमध्ये ४१ आणि हिंगोलीमध्ये १३ तक्रारी प्राप्त झाल्या आहेत. महाबीजविरोधातील तक्रारींमध्ये नांदेडमध्ये ९४, धाराशिवमध्ये ३३ आणि परभणीमध्ये ३१ तक्रारींचा समावेश आहे. यंदा मान्सूनने सुरुवातीला हजेरी लावल्यानंतर दीर्घ खंड पडल्यामुळे खरीप पेरण्या टप्प्याटप्प्याने झाल्या. जुलैच्या पहिल्या आठवड्यात झालेल्या पावसानंतर शेतकऱ्यांनी मोठ्या प्रमाणावर पेरणी केली. मात्र त्यानंतर पुन्हा पाऊस गायब झाल्याने अनेक ठिकाणी बियाण्यांची उगवणच झाली नाही, तर उगवलेली पिकेही करपू लागली आहेत. याचा थेट परिणाम खरीप पेरण्यांवर झाला असून, लातूर विभागात आतापर्यंत केवळ ६१ टक्के क्षेत्रावर पेरणी झाली आहे. लातूर जिल्ह्यात ४३ टक्के, तर धाराशिव जिल्ह्यात ५० टक्के पेरण्या पूर्ण झाल्या आहेत. शेतकऱ्यांकडून वाढत्या तक्रारींनंतर तालुकास्तरीय बियाणे तक्रार निवारण ▶▶ पान २ वर

# विदर्भ, मराठवाड्यात पावसाचा अंदाज




पुणे । प्रतिनिधी

**राज्यातील काही भागात ३ दिवस तुरळक ठिकाणी वादळी पावसाचा अंदाज आहे. पूर्व विदर्भ आणि मराठवाड्यातील काही भागात पावसाला पोषक हवामान आहे. त्यानंतर दोन दिवस पावसाची उघडीप राहण्याची शक्यता असल्याचे हवामान विभागाने म्हटले आहे.**

हवामान विभागाने शुक्रवारी विदर्भातील यवतमाळ, वर्धा, नागपूर, भंडारा, गोंदीया, गडचिरोली जिल्ह्यात काही ठिकाणी विजांसह वादळी पावसाचा अंदाज दिला आहे. तर विदर्भातील इतर जिल्ह्यांमध्ये ढगाळ हवामानासह काही ठिकाणी हलक्या सरी पडतील, अशीही शक्यता वर्तविण्यात आली आहे. मराठवाड्यातील हिंगोली, नांदेड, लातूर आणि धाराशिव जिल्ह्यात काही ठिकाणी वादळी पावसाचा अंदाज आहे. तर इतर जिल्ह्यांमध्ये ढगाळ हवामानासह काही ठिकाणी हलक्या सरी पडतील, असा अंदाज आहे. तसेच ▶▶ पान २ वर

# ग्राहकाला नवी कार द्या; अन्यथा पूर्ण पैसे परत करा!

## ई–२० पेट्रोल वादात देशातील पहिला ऐतिहासिक निर्णय




रायपूर । वृत्तसंस्था

ई–२० पेट्रोलशी संबंधित वादात ग्राहक आयोगाने ग्राहकाच्या बाजूने ऐतिहासिक निर्णय देत वाहन उत्पादक कंपनीला दोषमुक्त नवी कार देण्याचा किंवा ग्राहकाने भरलेली संपूर्ण रक्कम परत करण्याचा आदेश दिला आहे. देशातील या पहिल्या महत्त्वाच्या निर्णयामुळे वाहन उत्पादक कंपन्यांवर ग्राहकांना योग्य माहिती देण्याची आणि गुणवत्तापूर्ण उत्पादने उपलब्ध करून देण्याची जबाबदारी अधिक स्पष्ट झाली असून, भविष्यात अशा प्रकरणांमध्ये हा निर्णय महत्त्वाचा संदर्भ ठरणार आहे.

देशात ई–२० इंधनाबाबत वादळ उठलेले असतानाच, छत्तीसगडच्या रायपूर जिल्हा ग्राहक न्यायालयाने एका नामांकित कार कंपनी आणि तिच्या स्थानिक डीलरविरुद्ध अत्यंत कडक निर्णय सुनावला आहे. ग्राहकाची फसवणूक व निकृष्ट सेवेसाठी कंपनी व ▶▶ पान २ वर

# पार्थ पवारांना मंत्रिपद देण्याच्या पत्रावरून तटकरे-पटेल नाराज ?

## ● यामुळेच फडणवीसांची भेट घेतली असल्याच्या चर्चेला उधाण

पुणे । प्रतितिधी

राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये अंतर्गत मतभेदांच्या चर्चांना पुन्हा उधाण आले आहे. पक्षाचे प्रदेश उपाध्यक्ष उदयकुमार आहेर यांनी उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांना लिहिलेल्या पत्रानंतर पक्षातील राजकीय घडामोडींना वेग आल्याचे बोलले जात आहे. या पत्रात खासदार पार्थ पवार यांना आगामी केंद्रीय मंत्रिमंडळ विस्तारात मंत्रीपद देण्याची जोरदार शिफारस करण्यात आली आहे. यामुळेच तटकरे–पटेल नाराज झाले असून, त्याचसाठी त्यांनी मुख्यमंत्री फडणवीस यांची भेट घेतली असल्याची चर्चा होत आहे.

सूत्रांच्या माहितीनुसार, या पत्रातील काही मजकुरामुळे पक्षाचे ज्येष्ठ नेते प्रफुल्ल पटेल आणि सुनील तटकरे नाराज झाल्याची चर्चा आहे. त्यानंतर दोन्ही नेत्यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेतल्याचीही राजकीय वर्तुळात चर्चा रंगली आहे. मात्र, या भेटीमागील कारणांबाबत कोणतीही अधिकृत माहिती समोर आलेली नाही.



१३ जुलै ३२०२६ रोजी लिहिलेल्या पत्रात उदयकुमार आहेर यांनी पार्थ पवार यांना केंद्रीय मंत्रिमंडळात स्थान देण्यामागे अनेक कारणे नमूद केली आहेत. त्यामध्ये त्यांचे तरुण नेतृत्व, राष्ट्रीय स्तरावरील संवादकौशल्य, परदेशातील शिक्षण, युवा वर्गाला आकर्षित करण्याची क्षमता आणि पक्षाचा विस्तार करण्याची क्षमता यांचा उल्लेख करण्यात आला आहे. तसेच, पत्रात पार्थ पवार यांच्याविरोधात पक्षांतर्गत पातळीवर कारस्थान सुरू असल्याचा आरोप करण्यात आला असून, त्यांना मोठी संधी देणे ही काळाची गरज असल्याचे मत व्यक्त करण्यात आले आहे. दरम्यान, पक्षातील एका पदाधिकाऱ्याने अशा स्वरूपाचे पत्र लिहिल्यामुळे ज्येष्ठ नेतृत्व नाराज ▶▶ पान २ वर



# एसटीच्या तिकीट दरात १३.५६ टक्क्यांची वाढ

मुंबई । प्रतिनिधी

**राज्य परिवहन प्राधिकरणाने महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या (एसटी) १३.५६ टक्के भाडेवाढीच्या प्रस्तावास मान्यता दिली आहे. आखाती देशांतील युद्धजन्य परिस्थितीमुळे डिझेलच्या दरात झालेली वाढ, एसटी कर्मचाऱ्यांच्या विविध भत्त्यांमध्ये करण्यात आलेली वाढ तसेच वाहनांचे सुटे भाग, टायर आणि देखभाल खर्चात झालेली लक्षणीय वाढ यांचा सर्वंकष विचार करून हा निर्णय घेण्यात आला आहे. अर्थात, या भाडेवाढीच्या मुळे या पुर्वी केलेली साध्या बसेसची १० टक्के हंगामी भाडेवाढ रद्द होईल.** ▶▶ पान २ वर

# सोनम वांगचुक यांचा अवयव निकामी होण्याचा इशारा

## उपोषणाच्या २० व्या दिवशी प्रकृती चिंताजनक

दिल्ली । प्रतिनिधी

**शिक्षण व्यवस्थेतील कथित गैरव्यवहार आणि नीट परीक्षा पेपरफुटी प्रकरणात केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्याच्या मागणीसाठी उपोषणाला बसलेले सामाजिक कार्यकर्ते आणि शिक्षणतज्ज्ञ सोनम वांगचुक यांच्या उपोषणाचा शुक्रवारी २० वा दिवस होता. सलग २० दिवस अन्नत्याग केल्यामुळे त्यांची प्रकृती गंभीर बनली असून, डॉक्टरांनी अवयव निकामी होण्याचा धोका असल्याचा इशारा दिला आहे.**

डॉक्टरांच्या माहितीनुसार, उपोषण सुरू झाल्यापासून सोनम वांगचुक यांचे ९ किलोहून अधिक वजन कमी झाले आहे.



त्यांचे सध्याचे वजन ५६.९ किलो इतके आहे. शरीरातील ग्लुकोज आणि चरबीचा साठा संपल्यानंतर आता शरीर ऊर्जेसाठी स्नायूंचा वापर करत असल्याचे डॉक्टरांनी सांगितले. त्यामुळे त्यांच्या शरीरातील युरिक ॲसिडची पातळीही मोठ्या प्रमाणात वाढली असून, स्नायू ▶▶ पान २ वर

### मोदींकडून वांगचुक यांची भेट का नाही–सपकाळ

सामाजिक कार्यकर्ते सोनम वांगचुक यांचे मुद्दे व काँग्रेस पक्षाचे मुद्दे सारखेच असून काँग्रेस पक्षाने वांगचुक यांच्या आधीपासूनच नीट परीक्षेचा मुद्दा हाती घेत शिक्षण मंत्र्यांच्या राजीनाम्याची मागणी केली. दोघांचा लढा एकाच मुद्द्यासाठी, त्यामुळे राहुल गांधी यांनी त्यांची भेट का घेतली नाही, यापेक्षा पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी वांगचुक यांची अद्याप भेट का घेतली नाही? शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान यांचा राजीनामा का घेतला नाही? हा आहे, असा घणाघाती हल्लाबोल काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी केला.




# नीट परीक्षेचा निकाल जाहीर

नवी दिल्ली । वृत्तसंस्था

राष्ट्रीय परीक्षा संस्थेने नीट–युजी २०२६ परीक्षेचा निकाल जाहीर केला असून, देशभरातील पदवीपूर्व वैद्यकीय प्रवेशांसाठी ११.२१ लाख उमेदवार पात्र ठरले आहेत. भारतातील ५५१ शहरे आणि परदेशातील १४ शहरांमधील ५,४४० केंद्रांवर घेण्यात आलेल्या या प्रवेश परीक्षेला सुमारे २० लाख उमेदवार बसले होते. पंजाबचा आर्यन गुप्ता ▶▶ पान २ वर

## बाजारभाव

कृषि उत्पन्न बाजार समिती,

बीड, दि.१७ जुलै २०२६

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

| | किमान | कमाल | सरासरी |
|---|---|---|---|
| गहू: ६५.०० क्विंटल | २,५९० | २,७५२ | २,६३८ |
| ज्वारी/हायब्रिड: ९३.५० क्विंटल | १,९०१ | ४,७०२ | ३,३११ |
| मका/लोकल: ४.०० क्विंटल | १,७७० | १,७७० | १,७७० |
| तूर : २.०० क्विंटल | ७,१०० | ७,१०० | ७,१०० |
| उडीद : २.०० क्विंटल | ५,००० | ५,००० | ५,००० |
| बाजरी: ७४.५० क्विंटल | २,२८८ | ३,००० | २,७१३ |
| मुग: १.०० क्विंटल | ७,०६० | ७,०६० | ७,०६० |
| सोयाबीन:१.५० क्विंटल | ६,६०० | ६,६०० | ६,६०० |
| हरभरा: ६.५० क्विंटल | ४,७०१ | ५,७०२ | ५,०५१ |

# जयंत पाटलांचे ऐन आषाढीत भेटी लागी जीवा.....!




बीड– मुंबई । प्रतिनिधी

**मुंबईतील वर्षा या शासकीय निवासस्थानी जयंत पाटील यांनी देवेंद्र फडणवीस यांची बंद दाराआड भेट घेतली. याचवेळी अजित पवार गटाचे कार्याध्यक्ष प्रफुल्ल पटेल आणि प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे हे देखील फडणवीसांना भेटायला पोहोचल्याने राजकीय भूवया उंचावल्या होत्या. शरद पवारांचे अत्यंत विश्वासू असलेल्या जयंत पाटलांच्या भेटीगाठी पाहता एनडीएसोबत जाण्याच्या चर्चेला आणखी बळकटी मिळाली आहे. विशेष म्हणजे आषाडीत भेटी लागे जिवा, लागलीस आस...या अभंगाप्रमाणे नेमके काय घडणार याकडे लक्ष लागून आहे.**

फडणवीस यांच्या भेटीच्या अवघ्या काही दिवस आधी जयंत पाटील यांनी भाजपचे राष्ट्रीय नेते विनोद तावडे यांचीही मुंबईत भेट घेतली होती. एकाच आठवड्यात भाजपच्या दोन अत्यंत वजनदार नेत्यांची (पहिले विनोद तावडे आणि नंतर देवेंद्र फडणवीस) जयंत पाटील यांनी घेतलेली भेट ही केवळ योगायोग मानली जात नाही. अजित पवार गटातील नेत्यांसोबत जयंत पाटील यांच्या थेट औपचारिक बैठका झालेल्या



नसल्या, तरी विधानभवनातील एका खोलीत अजित पवार गटाच्या काही आमदारांनी जयंत पाटील यांची भेट घेतल्याची मोठी चर्चा झाली होती. शरद पवार गट एनडीएमध्ये सामील होण्याची चर्चा आहे. मतदारसंघ पुर्नरचना विधेयकाला पाठिंबा देण्याचे सुतोवाच पक्षाकडून करण्यात आले आहे. दुसरीकडे, शरद पवारांचे अत्यंत विश्वासू असलेल्या जयंत पाटलांच्या भेटीगाठी पाहता एनडीएसोबत जाण्याच्या चर्चेला आणखी बळकटी मिळाली आहे. सांगली जिल्ह्यातील उरूण–ईश्वरपूर नगरपालिकेचे लोकनियुक्त नगराध्यक्ष आनंदराव मलगुंडे आणि त्यांचे बंधू सुनील मलगुंडे यांचे पद रद्द करण्याच्या निर्णयामुळे राजकीय वर्तुळात खळबळ उडाली आहे. या पार्श्वभूमीवर, राष्ट्रवादी काँग्रेसचे (शरदचंद्र पवार) ज्येष्ठ नेते जयंत पाटील यांनी गुरूवारी (१६ जुलै) मलगुंडे बंधूसह राज्याचे उपमुख्यमंत्री तथा नगरविकास मंत्री एकनाथ शिंदे यांची मुंबईत भेट घेतली. या भेटीबाबत स्वतः जयंत पाटील यांनी ट्विट करून सविस्तर माहिती दिली आहे. पाटील यांनी आपल्या ट्विटमध्ये म्हटले आहे की, ''माझ्या ईश्वरपूर मतदारसंघातील उरूण–ईश्वरपूर नगरपरिषदेचे नगराध्यक्ष आनंदराव मलगुंडे हे तब्बल ७ हजार २०० मताधिक्याने जनतेतून थेट लोकनियुक्त नगराध्यक्ष म्हणून निवडून आले आहेत. पदभार स्वीकारल्यापासून त्यांनी ईश्वरपूर ▶▶ पान २ वर

# गुजरातमध्ये एटीएसची मोठी कारवाई

## जैश ए मोहम्मदशी संबंधीत ५ संशयितांना अटक



अहमदाबाद । वृत्तसंस्था

**दहशतवादी विरोधी पथकाने गुजरातमध्ये मोठी कारवाई केली आहे. गुजरातच्या वेगवेगळ्या शहरांमधून एटीएसने जैश – ए – मोहम्मदशी संबंधीत पाच आणि इतर संशयितांना अटक करण्यात आली आहे.**

अटक केलेल्या आरोपींमध्ये बिलाल आबिद शेरा, मोहम्मद अयुब काडीवाल उर्फ मोहम्मद खडियासन, मोहम्मद शफी मुखी उर्फ शफी चापी, मोहम्मद हसन कराडिया उर्फ हसन हैदरपुरी आणि मोहम्मद असुब सुमासरा उर्फ मोहम्मद खली यांचा समावेश आहे. त्यांचा संबंध हा गेल्या महिन्यात देशभरातून अटक ▶▶ पान २ वर

cmyk

## अग्रलेख

# कर्जावर चालणारा मध्यमवर्ग, थांबलेली रोजगारनिर्मिती आणि सरकारची विकासकथा

एकेकाळी ''आधी बचत, मग खर्च'' हे भारतीय मध्यमवर्गाचे आर्थिक तत्त्वज्ञान होते. आज परिस्थिती उलटी झाली आहे. ''आधी कर्ज, मग खर्च'' हीच अनेक कुटुंबांची जीवनशैली बनत चालली आहे. ही केवळ आर्थिक सवय बदलल्याची गोष्ट नाही; ती देशाच्या अर्थव्यवस्थेसाठी आणि सामाजिक स्थैर्यासाठी गंभीर इशारा आहे. मार्सेलम इन्व्हेस्टमेंट मॅनेजर्सचे संस्थापक सौरभ मुखर्जी यांनी मांडलेल्या विश्लेषणानुसार, भारतातील घरगुती कर्जाचे उत्पन्नाशी असलेले प्रमाण ३२ टक्क्यांपर्यंत पोहोचले आहे. अनेक कर्जबाजारी कुटुंबांच्या मासिक उत्पन्नातील जवळपास ४० टक्के रक्कम केवळ ईएमआय भरण्यात खर्च होत आहे. त्याचवेळी, वैयक्तिक कर्जांचा मोठा हिस्सा जीवनशैली, पर्यटन आणि उपभोगासाठी घेतला जात असल्याचेही चित्र समोर येत आहे.

जर रोजगार वाढत असेल, उत्पन्न सातत्याने वाढत असेल आणि अर्थव्यवस्था सर्व स्तरांवर संधी निर्माण करत असेल, तर कर्जाचा भार काही प्रमाणात पेलता येतो. पण रोजगारनिर्मितीच मंदावली, स्थिर नोकऱ्या कमी झाल्या आणि नव्या पदवीधरांसाठी संधी आटल्या, तर कर्ज हे विकासाचे साधन न राहता आर्थिक सापळा बनते. याच ठिकाणी सरकारसमोर काही मूलभूत प्रश्न उभे राहतात. देशातील लाखो तरुणांना स्थिर आणि गुणवत्तापूर्ण रोजगार मिळत नसेल, तर विकासाचे मोजमाप नेमके कोणत्या निकषांवर केले जात आहे? जर मध्यमवर्गाचा मोठा हिस्सा आपल्या उत्पन्नाचा मोठा भाग ईएमआयमध्ये खर्च करत असेल, तर त्यांची क्रयशक्ती वाढल्याचा दावा कितपत वास्तववादी आहे? जर शिक्षण पूर्ण करूनही लाखो तरुण स्पर्धा परीक्षांच्या चक्रात वर्षानुवर्षे अडकून राहत असतील, तर देशाची रोजगारनीती अपेक्षित परिणाम देत आहे का? अर्थात, या समस्येची सर्व जबाबदारी सरकारवर टाकणेही योग्य ठरणार नाही. सोशल मीडियावर दिसणारी दिखाऊ जीवनशैली, सहज उपलब्ध होणारी कर्जव्यवस्था आणि वाढता उपभोगवाद यांचाही या संकटात मोठा वाटा आहे. आर्थिक साक्षरतेचा अभाव अनेक कुटुंबांना अनावश्यक कर्जाच्या विळख्यात ढकलत आहे. परंतु रोजगारनिर्मिती, कौशल्यविकास, उद्योगधोरण, वित्तीय स्थैर्य आणि ग्राहक संरक्षण ही सरकारची मूलभूत जबाबदारी आहे. त्यामुळे या प्रश्नांकडे केवळ वैयक्तिक आर्थिक शिस्तीचा विषय म्हणून पाहून चालणार नाही.

आज देशात मोठ्या पायाभूत सुविधा उभ्या राहत आहेत, डिजिटल व्यवहार वाढत आहेत आणि अर्थव्यवस्था जगातील आघाडीच्या अर्थव्यवस्थांपैकी एक बनण्याचे लक्ष्य ठेवत आहे. पण जर या विकासाचा पाया असलेला मध्यमवर्गच वाढत्या कर्जाखाली दबत असेल आणि तरुणांना रोजगारासाठी अनिश्चिततेचा सामना करावा लागत असेल, तर विकासाचा लाभ समाजाच्या तळागाळापर्यंत खरोखर पोहोचत आहे का, हा प्रश्न विचारणे लोकशाहीत चुकीचे ठरू शकत नाही. सरकारने या विषयावर अधिकृत आणि पारदर्शक आकडेवारीसह उत्तर देणे गरजेचे आहे. दरवर्षी किती गुणवत्तापूर्ण नोकऱ्या निर्माण झाल्या? मध्यमवर्गाचे कर्ज का वाढत आहे? आर्थिक वाढीचा प्रत्यक्ष लाभ कोणाला मिळत आहे? या प्रश्नांची स्पष्ट उत्तरे जनतेला मिळाली, तरच विकासाच्या दाव्यांवर विश्वास अधिक दृढ होईल. कारण समृद्ध राष्ट्राची ओळख केवळ वाढत्या जीडीपीने होत नाही; ती आर्थिकदृष्ट्या सक्षम, रोजगारसंपन्न आणि कर्जाच्या ओझ्याखाली न दबलेल्या मध्यमवर्गाने ठरते. लोकशाहीत सरकारच्या धोरणांवर तथ्यांच्या आधारे प्रश्न विचारणे हे विरोध नव्हे, तर उत्तरदायित्वाची अपेक्षा आहे.



## सेवानिवृत्त शिक्षणाधिकारी भगवान सोनवणे यांचा पप्पू कागदे यांच्याकडून सन्मान

बीड । प्रतिनिधी

**रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया, आठवले गटाचे युवा प्रदेशाध्यक्ष पप्पू कागदे शिक्षणाधिकारी भगवान सोनवणे यांचा भव्य सत्कार करण्यात आला.**

यावेळी फोटो रिपाई चे तालुकाध्यक्ष किशन तांगडे, माजी नगरसेवक जोगदंड, सेवानिवृत्त अधिकारी कर्मचारी संघटनेचे जिल्हाध्यक्ष तथा सेवानिवृत्त जेष्ठ शिक्षण विस्तार अधिकारी गौतम चोपडे, कनिष्ठ प्रशासन अधिकारी संतोष गायकवाड, सेवानिवृत्त अधीक्षक तुकाराम पवार, वरिष्ठ सहाय्यक कांबळे, आदींची उपस्थिती होती. यावेळी प्रदेशाध्यक्ष पप्पू कागदे यांनी सेवानिवृत्त शिक्षणाधिकारी भगवान सोनवणे यांनी शिक्षण आणि सामाजिक क्षेत्रातील केलेल्या उल्लेखनीय कार्याबद्दल गौरवोदगार काढले.

## व्यापाऱ्याची पैशांची बॅंग चोरी करणारे ४ आरोपी जेरबंद ५ लाखाचा मुददेमाल जप्त

जालना । प्रतिनिधी

**जालना शहरामध्ये जबरी चोरीचे गुन्हे उघडकीस आणणेबाबत मा. पोलीस अधिक्षक श्री. तेगबीर सिंह संधू यांनी स्थानिक गुन्हे शाखेचे पोलिसांना आदेश दिले होते त्या अनुषंगाने पोलिसांनी कारवाई केली याप्रकरणी**



उमेश बजाज, व्यापार, रा. फाईन सफायर, गोल्डन ज्युबली शाळेच्या पाठीमागे, जालना यांना नवीन मोंढा परिसरात अडवुन त्यांची रु.४,९६,०००/- रोख रक्कम असलेली पैशांची वैग तीन अनोळखी इसमांनी खंजर गळयाला जावुन जिवे मारण्याची धमकी देवुन हिस्कावुन घेतली व मोटार सायकलवरुन पळून गेले म्हणुन फिर्यादी यांच्या फिर्यादीवरुन पोलीस ठाणे चंदनझिरा येथे गुरनं. ४६८/२०२६ कलम ३०९(४), ३(५) भा.न्या.सं. प्रमाणे गुन्हा दाखल झाला होता. सदर गुन्हयातील अनोळखी मोटार सायकल स्वारांचा शोध घेवुन गुन्हा तात्काळ उघड उघडकीस त्यानुषंगाने आरोपीतांचा तांत्रिक पुरावे व गोपनीय बातमीदारामार्फत माहिती घेत असतांना सदरचा गुन्हा अयान ऊर्फ पंच्यान्नव अमजद अली, वय-२० वर्ष, रा.हिंदनगर, जालना २) शेख उमर शेख रहिम, वय १८ वर्ष, रा. गुंडेवाडी, जालना ३) शेख अब्दुल शाहिद ऊर्फ मीटर शेख रशिद, वय-२० वर्ष, रा. हिंदनगर, जालना यांनी केला असुन व्यापाऱ्याकडे पैसे असल्याबाबत आरोपी आरिफ रहिमोद्दीन अन्सारी, वय-२८ वर्ष, रा. हिंदनगर, जालना याने पुरविली होती. त्यामुळे त्यांना ताब्यात घेण्यात आले व वरील प्रमाणे गुन्हा उघड करण्यात आला आहे. आरोपी अयान ऊर्फ पंच्यान्नव अमजद अली, वय-२० वर्ष, रा. हिंदनगर, शेख उमर शेख रहिम, वय १८ वर्ष, रा. गुंडेवाडी, जालना शेख अब्दुल शाहिद ऊर्फ मीटर शेख रशिद, वय-२० वर्ष, रा. हिंदनगर, जालना आरिफ रहिमोद्दीन अन्सारी, वय-२८ वर्ष, रा. हिंदनगर, जप्त मुददेमाल:- १ रु.४.८१,५००/-/- किंमतीची रोख रक्कम २ रु.५०,०००/- किंमतीची गुन्हयात वापरलेली हिरो होंडा स्प्लेंडर मोटार सायकल ३ रु.४०,०००/- किंमतीचे गुन्हा करतांना वापरलेले ०४ मोबाईल ४ रु.१०००/- किंमतीचा एक खंजर ५ रु.००/- किंमतीची फिर्यादीची सँग एकुण रु.५,७२,५००/- कारवाई करणारे अधिकारी व अंमलदार सदरची कार्यवाही मा. पोलीस अधीक्षक श्री. तेघबीर सिंह संधू , मा. अपर पोलीस अधीक्षक श्री. विक्रम साळी , मा. उपविभागीय पोलीस अधिकारी, उपविभाग जालना श्री. अनंत कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिसांनी कारवाई केली.



## संतश्रेष्ठ नर्सिंनामदेव महाराज पालखीचे जवळबन येथे जल्लोषात स्वागत

केज । प्रतिनिधी

**हिंगोली जिल्ह्यातील नर्सिंनामदेव महाराज पालखीचे बीड जिल्ह्यातील जवळबन येथे आज सकाळी वाजत गाजत जंगी स्वागत करण्यात आले. यावेळी पालखीच्या स्वागतासाठी रस्त्यावर रांगोळी काढल्या होत्या. यावेळी विधिवत पूजा सुनील करपे कुटुंबाने केली त्यानंतर कार्यक्रमाला सुरुवात झाली.**

मराठवाड्यातील ग्रामीण भागातील पहिला अश्व रिंगण सोहळा जवळबन या ग्रामीण भागातील गावात प्रत्येक वर्षाप्रमाणे याही वर्षी मोठया उत्साहात संपन्न झाला आहे. तर यावेळी फुगडी, वारकऱ्यांचे रिंगण तसेच अश्व रिंगण अश्या विविध कार्यक्रमाने गावकऱ्यांच्या डोळ्याचे पारणे फेडले आहे. गावात अगदी भक्तिमय वातावरण निर्माण झाले होते. गावातील कैलास वासी निवृत्त सोपानराव करपे यांनी १९९५ साली संतश्रेष्ठ नामदेव महाराजांच्या दिंडीला गावात सुरुवात केली ती आजतागायत सुरू आहे. हे ३१ वे वर्षे आहे. गावातील हनुमान मंदिरात कीर्तन, भजन करून, महाप्रसाद घेऊन ही पालखी आज पुढे युसुफवडगाव येथे मुक्काम करणार असून उद्या रविवारी पंढरपूरसाठी प्रस्थान करणार आहे. यावर्षी पाऊस नसल्याने दुष्काळाचे सावट आहे. यामुळे गावकऱ्यांनी नामदेव महाराजांच्या चरणी चांगला पाऊस पडू देत अस साकडं घातल्याची प्रतिक्रिया गावकरी कुलदीप करपे यांनी दिली आहे.

## अल्पावधीत शंभर टक्के अचूक कामगिरी बजावणारे बीएलओ रघु यादव यांचा गौरव

वडवणी । प्रतिनिधी

भारत निवडणूक आयोगाच्या विशेष संक्षिप्त पुनरिक्षण (एसआयआर) मोहिमेदरम्यान अत्यंत कमी कालावधीत नियोजनबध्द, जबाबदारीने व शंभर टक्के अचूकतेने काम पूर्ण करुन आदर्श कार्य करणारे वडवणी तालुक्यातील दुकडेगांव येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेचे प्रभारी मुख्याध्यापक तथा बूथ लेव्हल ऑफिसर (बीएलओ) रघु इराप्पा यादव सर यांच्या उल्लेखनीय कार्याचा वडवणी गटसाधन केंद्र येथे यथोचित गौरव करण्यात आला.

याप्रसंगी वडवणीचे सहाय्यक निवडणूक नोंदणी अधिकारी तथा गटशिक्षणाधिकारी राहुल भट्टी साहेब तसेच पर्यवेक्षक व कन्या वडवणीचे केंद्रिय मुख्याध्यापक सैलानी शेख सर यांच्या हस्ते रघु यादव यांना पुष्पगुच्छ, शाल देवून गौरविण्यात आले. यावेळी मान्यवरांनी विशेष संक्षिप्त पुनरिक्षण मोहिमेत यादव सर यांनी दाखविलेली कार्यक्षमता, वेळेचे प्रभावी नियोजन, प्रामाणिकपणा, कर्तव्यनिष्ठा आणि निवडणूक प्रक्रियेबाबतची बांधिलकी यांचे विशेष कौतुक केले. मतदार यादी अद्ययावत करण्यासारख्या अत्यंत महत्त्वाच्या कामात त्यांनी अचूकता आणि पारदर्शकतेला सर्वोच्च प्राधान्य देत उत्कृष्ट कामगिरी बजावल्याचे गौरवोद्गार काढले. भविष्यातही अशाच समर्पित वृत्तीने कार्य करत राहण्यासाठी त्यांना शुभेच्छा देण्यात आल्या. या सन्मानाबध्दल मनोगत व्यक्त करतांना रघु यादव म्हणाले, हा सन्मान माझा एकट्याचा नसून निवडणूक प्रक्रियेत प्रामाणिकपणे आणि जबाबदारीने कार्य करणाऱ्या प्रत्येक बीएलओ, शिक्षक व सहकाऱ्यांचा आहे. वरिष्ठ अधिकाऱ्यांचे योग्य मार्गदर्शन, सहकाऱ्यांचे सहकार्य आणि नागरिकांचा सकारात्मक प्रतिसाद यामुळेच विशेष संक्षिप्त पुनरिक्षण मोहिमेचे काम शंभर टक्के अचूकतेने पूर्ण करता आले. निवडणूक आयोगाने दिलेली जबाबदारी ही माझ्यासाठी कर्तव्य आणि लोकशाहीप्रती असलेली सेवा आहे. भविष्यातही याच निष्ठेने, पारदर्शकतेने आणि समर्पित भावनेने काम करत राहण्याचा मी सदैव प्रयत्न करेन असेही ते शेवटी म्हणाले. या सत्कार समारंभास चिंचवणचे केंद्रिय मुख्याध्यापक सचिन कदम सर, दुकडेगांव येथील शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष राजेभाऊ कराड, परमेश्वर सोनवणे, तसेच हेंडगे सर, तांबोळी सर, पवार सर, राठोड सर, रोमन सर, वाव्हळ सर यांच्यासह अनेक शिक्षक, कर्मचारी व मान्यवर उपस्थित होते. उपस्थितांनी यादव सर यांच्या कार्याचे मनापासून अभिनंदन करत, निवडणूक आयोगाच्या महत्त्वपूर्ण मोहिमेत त्यांनी बजावलेली जबाबदारी ही इतरांसाठी प्रेरणादायी असल्याचे मत व्यक्त केले. अशा कर्तव्यदक्ष अधिकारी व शिक्षकांमुळे निवडणूक प्रक्रिया अधिक सक्षम, पारदर्शक आणि विश्वासार्ह बनत असल्याचेही यावेळी अधोरेखित करण्यात आले. या कार्यक्रमाचा समारोप अभिनंदन व शुभेच्छांच्या वातावरणात झाला. उपस्थितांनी हा सत्कार केवळ एका व्यक्तीचा गौरव नसून, प्रामाणिकपणे व निष्ठेने सार्वजनिक जबाबदारी पार पाडणाऱ्या प्रत्येक कर्मचाऱ्याच्या कार्याचा सन्मान असल्याची भावना व्यक्त केली.



## भगवानगडाच्या पालखींचा तागडगाव येथे नयनरम्य रिंगण सोहळा

बीड । प्रतिनिधी

**ऐश्वर्या संपन्न संत श्रेष्ठ भगवान बाबा यांनी नारायण गड येथून पहिला दिंडी सोहळा सुरू केला. प्रति वर्षाप्रमाणे पंढरपूरच्या आषाढी एकादशीनिमित्त भव्य दिव्य स्वरूपातून हा दिंडी सोहळा आयोजित केला जातो.**

भगवान गडाचा हा दिंडी सोहळा दिनांक १३ जुलै रोजी भगवानगड ठरून प्रस्थान होऊन पहिला मुक्काम भारजवाडी येथे झाला. बावी येथील दुसऱ्या मुक्कामानंतर दुपारी संत श्रेष्ठ भगवान बाबा यांच्या मावशीचे गाव शिरूर तालुक्यातील तागडगाव येथे पहिला रिंगण सोहळा आयोजित करण्यात आला होता. या दिंडीमध्ये प्रतिवर्षी पायी वारकऱ्यांची संख्या मोठ्या प्रमाणात वाढत आहे. महंत डॉक्टर नामदेव महाराज शास्त्री यांच्या मार्गदर्शनाखाली सदर दिंडी सोहळा प्रतिवर्षी काढण्यात येतो यावर्षी उत्तराधिकारी कृष्णा महाराज, भगवान गडाचे प्रधान आचार्य ह भ प नारायण शास्त्री महाराज, ह.भ.प. राजपूत महाराज, ह.भ.प. अतुल शास्त्री महाराज, ह भ प हनुमंत शास्त्री महाराज, आदीच्या उपस्थितीत पालखी सोहळा पंढरपूर कडे मार्गक्रमण करत आहे. ऐश्वर्या संपन्न संतश्रेष्ठ भगवानबाबा यांच्या पालखी सोहळ्यात रथामध्ये भव्य पालखी पादुकांनी बाबांची प्रतिमा ठेवण्यात आली आहे. पालखीच्या अग्रभागी घोडा, झेंडेकरी, वारकरी, महिला भाविक मोठ्या संख्येने सहभागी झाले आहेत. शिरूर (कासार) तालुक्यातील तागडगाव येथे बुधवारी दुपारी झालेल्या रिंगण सोहळ्यास पायी दिंडीतील वारकरी, शिरूर तालुक्यातील आणि तागडगाव येथील भाविक मोठ्या संख्येने हा नयनरम्य सोहळा पाहण्यासाठी उपस्थित होते.

## माजी मंत्री सुरेश नवले व आ. अर्जुनजी खोतकर यांची सांत्वनपर भेट



बीड । प्रतिनिधी

**वक्फ बोर्डाचे अध्यक्ष समीर काझी यांचे वडील स्वर्गीय हाजी गुलामनबी कासमशा काझी यांच्या दुःखद निधनानिमित्त बीड येथील निवासस्थानी जाऊन त्यांच्या कुटुंबीयांची सांत्वनपर भेट घेण्यात आली.**

यावेळी माजी मंत्री सुरेश अण्णा नवले, माजी मंत्री तथा आमदार अर्जुनजी खोतकर, शिवसेना जिल्हाप्रमुख ॲड. चंद्रकांत आप्पा नवले, जालना संपर्कप्रमुख पंडितराव भुतेकर साहेब, कृष्णाजी खोतकर साहेब, जालना शहरप्रमुख विष्णू पाचफुले साहेब, अतुल सिंघानी, सचिन रासने तसेच समीर काझी यांचे बंधू फारुक काझी, मोहम्मद शफी काझी, जावेद काझी आणि काझी परिवारातील सदस्य उपस्थित होते. याप्रसंगी माजी मंत्री सुरेश अण्णा नवले व आमदार अर्जुनजी खोतकर यांनी स्वर्गीय हाजी गुलामनबी कासमशा काझी यांच्या निधनाबद्दल मनःपूर्वक शोक व्यक्त करून कुटुंबीयांचे सांत्वन केले. तसेच दिवंगत आत्म्यास भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करत, ईश्वर त्यांच्या आत्म्यास चिरशांती लाभो आणि काझी परिवारास हे दुःख सहन करण्याची शक्ती प्रदान करो, अशी प्रार्थना व्यक्त करण्यात आली.

## पान १ वरून...

### विदर्भ, मराठवाड्यात

सातारा, सांगली, सोलापूर, कोल्हापूर, सिंधूदुर्ग आणि रत्नागिरी जिल्ह्यातही काही ठिकाणी वादळी पावसाची शक्यता आहे. याशिवाय राज्यातील इतर काही भागात पाऊस पडण्याची शक्यता आहे. रविवारी विदर्भातील अमरावती, वर्धा, नागपूर, भंडारा, गोंदीया, यवतमाळ आणि गडचिरोली तसेच मराठवाड्यातील बीड, परभणी आणि हिंगोली तर मध्य महाराष्ट्रातली अहिल्यानगर आणि पुणे जिल्ह्यात काही ठिकाणी वादळी पावसाचा अंदाज आहे. तर मराठवाडा आणि मध्य महाराष्ट्रातील इतर जिल्ह्यांमध्ये काही ठिकाणी ढगाळ हवामानासह हलक्या पावसाचा अंदाज देण्यात आला आहे.

---------

### सोयाबीन बियाण्यांची

समित्यांनी पंचनामे सुरू केले आहेत. मात्र दिवसागणिक तक्रारींची संख्या वाढत असल्याने प्रशासनापुढेही मोठे आव्हान निर्माण झाले आहे. दरम्यान, काही खासगी कंपन्यांनी तक्रारीनंतर शेतकऱ्यांना नवीन बियाणे उपलब्ध करून दिल्याचे सांगितले जात असले, तरी महाबीजकडून अपेक्षित प्रतिसाद मिळत नसल्याची नाराजी शेतकऱ्यांनी व्यक्त केली आहे. महाबीजव्यतिरिक्त ऋषिकेश (३१), ओसवाल (२२), चेतक (७), तसेच बुस्टर, ओडीएसएफ, अंकूर, धनलक्ष्मी, कृषिधन, ग्रीन लिमका, इगल, सनॲग्री आणि प्यारी या कंपन्यांच्या सोयाबीन बियाण्यांबाबतही तक्रारी दाखल झाल्या आहेत. त्यामुळे बियाण्यांच्या गुणवत्तेचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला असून, संबंधित कंपन्यांवर कठोर कारवाई करण्याची मागणी शेतकरी संघटनांकडून होत आहे.

-------------

### पार्थ पवारांना मंत्रिपद देण्याच्या

झाल्याची चर्चा असली, तरी याबाबत राष्ट्रवादी काँग्रेसकडून किंवा संबंधित नेत्यांकडून अधिकृत भूमिका जाहीर करण्यात आलेली नाही. या घडामोडींमुळे राष्ट्रवादी काँग्रेसमधील अंतर्गत राजकारण आणि आगामी केंद्रीय मंत्रिमंडळ विस्ताराच्या पार्श्वभूमीवर सुरू असलेल्या चर्चांकडे राज्याच्या राजकीय वर्तुळाचे लक्ष लागले आहे.

--------------

### ग्राहकाला नवी कार द्या;

डीलरला दोषी धरत संबंधित ग्राहकाला ४५ दिवसांत ई-२० पेट्रोलला सपोर्ट करणारी नवी कार द्यावी; अन्यथा ही मुदत उलटल्यावर गाडीची मूळ किंमत, आरटीओ व विमा खर्च मिळून एकूण २० लाख ५० हजार ४९४ रुपये द्यावेत, असे आदेश न्यायालयाने दिले. ई-२० पेट्रोल व इंजिनमधील बिघाडाबाबत आलेला हा आदेश देशातील अशा स्वरूपाच्या पहिल्याच खटल्यातील आहे. या रकमेवर आदेशाच्या तारखेपासून पैसे मिळेपर्यंत प्रतिवर्ष ७ टक्के दराने व्याजही द्यावे लागेल. तसेच, ग्राहकाला झालेल्या मानसिक त्रासाबद्दल १ लाख रुपयांची नुकसानभरपाई आणि न्यायालयीन खर्चासाठी १० हजार रुपये स्वतंत्रपणे द्यावेत, असे आदेशही न्यायालयाने दिले. ग्राहक मंचाचे अध्यक्ष प्रशांत कुंडू आणि सदस्य डॉ. आनंद वर्गीस यांच्या खंडपीठाने हा ऐतिहासिक निकाल दिला. रायपूरमधील प्रसिद्ध किडनी रोगतज्ज्ञ डॉ. प्रेमराज देवता यांनी जून २०२४ मध्ये नामांकित कार कंपनीच्या शोरूममधून महागडी कार खरेदी केली. मात्र, सुरुवातीपासूनच त्यात सतत बिघाड होऊ लागला. इंजिन वारंवार बंद पडू लागले. डॉक्टर गाडी घेऊन सर्व्हिस सेंटरला पोहोचल्यावर कंपनी व डीलरने मोफत दुरुस्तीस नकार दिला. उलट सर्व्हिस सेंटर व कंपनीच्या अभियंत्यांनी डॉक्टरांना चक्क ५.३० लाखांचे दुरुस्तीचे अंदाजपत्रक दिले. पेट्रोलमध्ये इथेनॉल मिश्रणामुळे गाडीचे इंजिन खराब झाले. ही बाब वॉरंटी कक्षेत येत नाही, असे कंपनीचे म्हणणे होते. परंतु, प्रकरण ग्राहक न्यायालयात पोहोचल्यावर कंपनीच्या दाव्यातील हवा निघून गेली. पेट्रोलच्या मिश्रणावर ग्राहकाचे नियंत्रण नव्हते आणि कंपनीने जाणीवपूर्वक ग्राहकाची फसवणूक केली, हे न्यायालयाने मान्य केले. याच पार्श्वभूमीवर न्यायालयाने डॉक्टरांच्या बाजूने हा ऐतिहासिक निर्णय दिला, जो आगामी काळात ई-२० पेट्रोलशी संबंधित तक्रारींसाठी देशात एक वस्तुपाठ ठरेल.

-----------

### नीट परीक्षेचा

आणि हरियाणाचा पांशुल बन्सल यांनी संयुक्तपणे ७२० पैकी ७१५ गुणांसह देशात अव्वल स्थान पटकावले आहे. एनटीएच्या माहितीनुसार, १३८ उमेदवारांनी ७२० पैकी ६९० किंवा त्याहून अधिक गुण मिळवले आहेत, तर १९ उमेदवारांनी ७०० हून अधिक गुण प्राप्त केले आहेत. पंजाबचा आर्यन गुप्ता आणि हरियाणाचा पांशुल बन्सल यांनी संयुक्तपणे ७१५ गुणांसह सर्वोच्च गुण मिळवले. अधिकृत आकडेवारीनुसार, पात्र उमेदवारांपैकी ५८ टक्क्यांहून अधिक मुली आहेत. देशातील ६६ शहरांतील १३८ विद्यार्थ्यांनी ६९० किंवा त्यापेक्षा अधिक गुण मिळवले आहेत. त्यापैकी ९३ टक्क्यांहून अधिक विद्यार्थी प्रथमच नीट परीक्षा देणारे होते, तर ९९ टक्के विद्यार्थ्यांचे वय १७ ते १९ वर्षांदरम्यान असल्याचे एनटीएने स्पष्ट केले आहे. याशिवाय, १७ राज्यांतील अव्वल विद्यार्थ्यांनी ७०० किंवा त्यापेक्षा अधिक गुण, तर २६ राज्यांतील टॉपर्सनी ६९० पेक्षा अधिक गुण मिळवले आहेत.

----------

### सोनम वांगचुक यांचा अवयव

झपाट्याने कमजोर होत असल्याची माहिती डॉक्टरांनी दिली. डॉक्टरांनी इशारा दिला आहे की, योग्य वेळी वैद्यकीय उपचार मिळाले नाहीत तर शरीरातील महत्त्वाचे अवयव निकामी होण्याचा धोका निर्माण होऊ शकतो. दरम्यान, या प्रकरणाची दखल दिल्ली उच्च न्यायालयाने घेतली आहे. एका जनहित याचिकेवरील सुनावणीदरम्यान न्यायालयाने प्रशासनाला सोनम वांगचुक यांच्या प्रकृतीवर दररोज लक्ष ठेवण्याचे आणि प्रकृती खालावल्यास तातडीने आवश्यक उपचार करण्याचे निर्देश दिले आहेत. नागरिकाचा जीव सर्वात महत्त्वाचा असून, तो वाचवण्यासाठी प्रशासनाने आवश्यक ती सर्व पावले उचलावीत, असे न्यायालयाने स्पष्ट केले. मात्र डॉक्टरांच्या गंभीर इशाऱ्यानंतरही सोनम वांगचुक उपोषण मागे घेण्यास तयार नाहीत. त्यांनी व्हिडिओ मेसेजद्वारे आपल्या समर्थकांना २० जुलै रोजी होणाऱ्या प्रस्तावित संसद मोर्चात मोठ्या संख्येने सहभागी होण्याचे आवाहन केले. दरम्यान, सोनम वांगचुक यांच्या आंदोलनाला देशभरातील अनेक राजकीय नेते, कलाकार आणि सामाजिक कार्यकर्त्यांचा पाठिंबा मिळत आहे. आम आदमी पक्षाचे नेते अरविंद केजरीवाल यांनी जंतर-मंतर येथे जाऊन त्यांची भेट घेतली आणि केंद्र सरकारने त्यांच्या मागण्यांवर गांभीर्याने विचार करावा, असे आवाहन केले. याशिवाय संगीतकार विशाल दादलानी, अभिनेत्री सोनाक्षी सिन्हा, लेखिका शोभा डे, मनसे अध्यक्ष राज ठाकरे तसेच अनेक सामाजिक कार्यकर्त्यांनीही त्यांच्या प्रकृतीबद्दल चिंता व्यक्त करत उपोषण संपवण्याचे आवाहन केले आहे. तसेच सुप्रीम कोर्ट बार असोसिएशननेही पत्र लिहून सोनम वांगचुक यांनी आरोग्याचा विचार करून उपोषण मागे घ्यावे, अशी विनंती केली आहे.

-----------

### एसटीच्या तिकीट दरात

एसटी महामंडळाच्या आर्थिक शाश्वततेसह प्रवाशांना सुरक्षित, दर्जेदार आणि अखंड सेवा देण्यासाठी ही भाडेवाढ अपरिहार्य होती. वाढत्या खर्चाचा भार सहन करत राज्यातील लाखो प्रवाशांना सेवा देणाऱ्या एसटीच्या दैनंदिन कार्यावर आर्थिक ताण निर्माण होत असल्याने, सेवा सुरळीत ठेवण्यासाठी भाडेवाढीचा निर्णय आवश्यक ठरला आहे. ही भाडेवाढ एसटीची सेवा अधिक सक्षम आणि टिकाऊ बनविण्यासाठी करण्यात आली असून, प्रवाशांच्या सुरक्षित व विश्वासार्ह प्रवासासाठी आवश्यक सुविधा आणि गुणवत्तापूर्ण सेवा कायम राखण्यास त्यामुळे मदत होणार आहे, एसटी महामंडळाकडून सांगण्यात आले आहे.

-------------

### गुजरातमध्ये एटीएसची

करण्य४ात आलेल्या आठ दहशवाद्यांशी आहे. गुजरातमध्ये दहशवादी संघटनेचे स्लीपर सेल तयार करण्यासाठी जैश-ए-मोहम्मद अनेक वर्षांपासून प्रयत्न करत होता. गुज४रात दंगलीनंतर इंडियन मुजाहिद्दीनने अहमदाबादमध्ये साखळी बॉम्बस्फोट घडवून आणले होते. त्यात ५० पेक्षा जास्त लोकांची हत्या करण्यात आली. तर २०० पेक्षा जास्त लोकं जखमी झाले होते. जैश-ए-मोहम्मद देखील सतत भारतात विशेषकरून गुजरातमध्ये अपली पकड मिळवण्याचा प्रयत्न करत होता. त्यामुळं गुजरातमधील काही लोकांना आपल्याशी जोडून घेत दहशवादी कारवाया वाढवण्याची संधी मिळवण्याचा प्रयत्न झाला होता. एटीएस पोलीस उपाधीक्षक हर्ष उपाध्याय यांनी सांगितले की आधी अटक केलेल्या ८ दहशतवाद्यांच्या संपर्कात आलेल्या या पाच संशयित युवकवांना पोलिसांनी अटक केली आहे.

-----------

### जयंत पाटलांचे ऐन आषाढीत भेटी

शहरातील अनेक प्रलंबित आणि विधायक विकासकामांना गती देण्यासाठी प्रामाणिक प्रयत्न सुरू केले आहेत.'' ''मात्र, लोकनियुक्त नगराध्यक्ष आनंदराव मलगुंडे आणि त्यांचे बंधू सुनील मलगुंडे यांचे कुठलेतरी जुने अतिक्रमणाचे प्रकरण पुढे आणून त्यांचे नगराध्यक्ष व नगरसेवक पद रद्द ठरवण्यात आले आहे. हा निर्णय लोकभावनेचा आदर करणारा नाही. त्यामुळे या अन्यायाविरुद्ध दाद मागण्यासाठी आणि वस्तुस्थिती सरकारसमोर मांडण्यासाठी मी स्वतः आनंदराव मलगुंडे व सुनील मलगुंडे यांच्या समवेत उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची त्यांच्या शासकीय निवासस्थानी भेट घेतली,'' अशी माहिती जयंत पाटील यांनी दिली. मात्र त्यांच्या भेटी नंतर एनडीए मधील समावेशाची चर्चा अधिक बळकट होताना दिसते शिवाय शरद पवार यांची राष्ट्रवादी जर सत्तेत सहभागी झाली तर अर्थ मंत्री म्हणून त्याच्यावर जबादारी देणार असल्याची चर्चा आहे. विशेष म्हणजे आषाढीत भेटी लागे जिवा लागलीस आस...या अभंगाप्रमाणे नेमके काय घडणार याकडे लक्ष लागून आहे.

-------------

दैनिक
# राज्य लोकतंत्र
नवी दिशा... नवे विचार.....
शनिवार, दि. १८ जुलै २०२६


## थोडक्यात




### जिल्हा परिषद शाळेस आरओ जलशुद्धीकरण यंत्र भेट व अनाथ विद्यार्थ्यांना शालेय गणवेशांचे वाटप

दिंद्रुड । प्रतिनिधी

दिंद्रुड येथील खोलेश्वर मल्टीस्टेट संस्थेचे मुख्य कार्यकारी अधिकारी विलास पारेकर यांनी आपल्या वाढदिवसानिमित्त सामाजिक बांधिलकी जपत दिंद्रुड येथील शिवाजीनगर जिल्हा परिषद शाळेला आरओ जलशुद्धीकरण यंत्र भेट दिले. व पसायदान सेवा प्रकल्प ढेकणमोहा अनाथ विद्यार्थ्यांना शालेय गणवेशांचे वाटप केले, त्यांच्या या उपक्रमाचे विद्यार्थी, पालक आणि ग्रामस्थांकडून कौतुक होत आहे.

शिवाजीनगर जिल्हा परिषद शाळेतील विद्यार्थ्यांना स्वच्छ व शुद्ध पिण्याचे पाणी उपलब्ध व्हावे या उद्देशाने विलास पारेकर यांनी गुरुवारी वाढदिवसानिमित्त आरओ जलशुद्धीकरण यंत्र भेट दिले. या उपक्रमामुळे शाळेतील विद्यार्थ्यांना सुरक्षित व शुद्ध पिण्याच्या पाण्याची सुविधा उपलब्ध झाली आहे.यावेळी दिंद्रुड येथील सामाजिक कार्यकर्ते, पत्रकार, प्रतिष्ठित नागरिक तसेच शाळेचे मुख्याध्यापक, शिक्षक आणि ग्रामस्थ उपस्थित होते. उपस्थितांनी विलास पारेकर यांच्या या सामाजिक उपक्रमाचे स्वागत करत त्यांच्या वाढदिवसानिमित्त दिलेल्या या उपयुक्त भेटीबद्दल त्यांचे अभिनंदन केले.

### वीरशैव लिंगायत समाजाच्या गुणवंतांसाठी शिष्यवृत्तीची सुवर्णसंधी

माजलगाव । प्रतिनिधी

येथील सद्गुरू श्री मिस्कीन स्वामी संस्थान मठाच्या वतीने यंदाही वीरशैव लिंगायत समाजातील दहावी आणि बारावीच्या ८५ टक्के गुण घेऊन उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती देण्यात येणार आहे, अशी माहिती विद्यमान मठाधिपती श्रीगुरू चंद्रशेखर शिवाचार्य महाराज यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे दिली आहे. दरम्यान, दहावी आणि बारावी परीक्षेतील यशस्वी गुणवंतांचे श्री संस्थान मठातर्फे अभिनंदन करण्यात आले आणि मठाधिपती श्रीगुरू चंद्रशेखर शिवाचार्य महाराज यांनी गुणवंतांना शुभाशीर्वाद दिले.



लिंगैक्य श्री गुरू तपोरत्नं प्रभू पंडिताराध्य शिवाचार्य महाराज माजलगावकर यांनी अनेक वर्षांपासून समाजातील गुणवंत आणि गरजू विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती दिली. यंदाही गुरूपौर्णिमेला या शिष्यवृत्तीचे वितरण करण्यात येणार आहे. वीरशैव लिंगायत समाजातील गुणवंत विद्यार्थ्यांनी शिष्यवृत्ती प्राप्त करण्यासाठी दहावी किंवा बारावीच्या परीक्षेत ८५ टक्के गुण घेऊन उत्तीर्ण झाल्याची गुणपत्रिका आवश्यक असून सोबत आधारकार्डची प्रत येत्या दिनांक २६ जुलै २०२६ पर्यंत प्रत्यक्षात सद्गुरू श्री मिस्कीन स्वामी संस्थान मठाच्या व्यवस्थापनाकडे द्यावेत, असे आवाहनही श्रीगुरू चंद्रशेखर शिवाचार्य महाराज यांनी केले आहे. अधिक माहितीसाठी सद्गुरू श्री मिस्कीन स्वामी संस्थान मठ माजलगाव येथे संपर्क साधावा असे आवाहन करण्यात आले आहे.

# एक महिन्यापासून स्वच्छता ठप्प घाणीचे साम्राज्य पसरल्याने रोगराई

## तीन दिवसांत शहरातील स्वच्छता करा; मुख्याधिकारी, नगराध्यक्षांना न्यायालयाने झापले




माजलगाव । प्रतिनिधी

येथील नगरपालिकेकडून मागील एक महिन्यापासून स्वच्छतेचे काम बंद असल्याने शहरात घाणीचे साम्राज्य पसरले आहे.दि १६ जुलै गुरुवार रोजी संध्याकाळी ६:०० वाजता येथील न्यायालयाने नगराध्यक्ष, उपाध्यक्ष, मुख्याधिकारी व कर्मचाऱ्यांना बोलावून चांगलेच झापले.तीन दिवसात स्वच्छता न केल्यास नगराध्यक्षसह कर्मचाऱ्यांवर गुन्हे दाखल करण्याचे आदेश न्यायालयाने दिले असल्याचे वृत्त आहे.

येथील नगरपालिकेने एक महिन्यापासून स्वच्छतेकडे दुर्लक्ष केल्याने शहरात सर्वत्र घाणीचे साम्राज्य पसरले आहे.नाल्या तुंबल्याने दुर्गंधी पसरून डासांचा प्रादुर्भाव वाढला आहे.यामुळे



येथील न्यायालयाच्या दोन न्यायाधीशांना मलेरिया झाल्याने त्यांनी दि १६ जुलै गुरुवार रोजी संध्याकाळी ६:०० वाजण्याच्या सुमारास येथील नगराध्यक्षा शिफा बिलाल चाऊस, उपाध्यक्ष सहाल चाऊस, मुख्याधिकारी, पोलीस निरीक्षक, स्वच्छता निरीक्षक, सुपरवायझर, प्रभाग सात मधील नगरसेवकांना बोलावून घेतले. आणि स्वच्छतेबाबत प्रश्न विचारले परंतु कोणालाही व्यवस्थीतपणे उत्तरे न देता आल्याने तीन न्यायाधीशांनी नगराध्यक्ष व मुख्याधिकाऱ्यांना झापले.ही चर्चा न्यायालयाच्या आवारात दिसून आली

अन्यथा गुन्हे दाखल करू

तीन दिवसात माजलगाव शहराची स्वच्छता न केल्यास नगराध्यक्षांसह उपाध्यक्ष, मुख्याधिकारी व कर्मचाऱ्यांवर गुन्हे करण्याची आदेश न्यायालयाने दिल्याचे वृत्त आहे.

# बीडमध्ये ८ ऑगस्टला डॉ.अण्णाभाऊ साठे राज्यस्तरीय वक्तृत्व स्पर्धा

## विद्यार्थ्यांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे – मुख्य संयोजक प्रा. प्रदीप रोडे यांचे आवाहन

बीड । प्रतिनिधी

देवगिरी प्रतिष्ठान, बीडच्या वतीने साहित्यसम्राट डॉ. अण्णाभाऊ साठे यांच्या जयंतीनिमित्त दरवर्षीप्रमाणे याही वर्षी राज्यस्तरीय शालेय व महाविद्यालयीन वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. स्पर्धेचे हे १७ वे वर्ष असून, ही स्पर्धा शनिवार, दिनांक ८ ऑगस्ट २०२६ रोजी सकाळी ९:३० वाजता बीड येथील तुलसी संगणकशास्त्र व माहिती तंत्रज्ञान महाविद्यालयात पार पडणार आहे.

या स्पर्धेत वरिष्ठ (पदवी/पदव्युत्तर) आणि कनिष्ठ (इयत्ता ८ वी ते १२ वी) अशा दोन गटांचा समावेश आहे. वरिष्ठ गटासाठी संयुक्त महाराष्ट्र चळवळीच्या जडणघडणीत लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांचे योगदान, अण्णाभाऊ साठे यांच्या साहित्यातील आंबेडकरवादी



दृष्टिकोन आणि अण्णाभाऊ साठे यांच्या साहित्यातील मानवतावादी पैलू हे विषय ठेवण्यात आले आहेत.

कनिष्ठ गटासाठी अण्णाभाऊ साठे यांचे साहित्य मानवी कल्याणाचे आणि सामाजिक प्रबोधनाचे मार्गदर्शक, अण्णाभाऊ साठे यांच्या साहित्यात प्रतिबिंबित झालेले स्वातंत्र्य, समता आणि बंधुत्वाचे विचार आणि अन्याय व शोषणाविरुद्ध लढणारे अण्णाभाऊंच्या कादंबऱ्यांतील संघर्षशील नायक व नायिका हे विषय निश्चित करण्यात आले आहेत. वरिष्ठ गटासाठी प्रथम पारितोषिक १०,०००, द्वितीय ७,०००, तृतीय ५,००० तर तीन उत्तेजनार्थ पारितोषिके प्रत्येकी १,००० आणि सर्वांना प्रमाणपत्र देण्यात येणार आहे. कनिष्ठ गटासाठी प्रथम पारितोषिक ७,०००, द्वितीय ५,०००, तृतीय ३,००० आणि तीन उत्तेजनार्थ पारितोषिके प्रत्येकी १,००० व प्रमाणपत्र दिले जाणार आहे. कनिष्ठ गटासाठी प्रवेश शुल्क ५० आणि वरिष्ठ गटासाठी १०० निश्चित करण्यात आले आहे. सहभागी स्पर्धक आणि त्यांच्यासोबत येणाऱ्या शिक्षकांसाठी भोजनाची विनामूल्य व्यवस्था आयोजकांकडून करण्यात आली आहे. इच्छुक स्पर्धकांनी आपली नोंदणी २ ऑगस्ट २०२६ पर्यंत पूर्ण करणे आवश्यक आहे. पत्रिकेवरील प्रवेश व नोंदणी फॉर्मचा ठठ कोड स्कॅन करून ऑनलाइन नोंदणी करता येईल. बीड, धाराशीव, नांदेड, परभणी, संभाजीनगर, लातूर आदी जिल्ह्यांतील शिक्षक समन्वयकांमार्फतही ही नोंदणी प्रक्रिया पार पडणार आहे.

या राज्यस्तरीय स्पर्धेत राज्यातील जास्तीत जास्त विद्यार्थ्यांनी सहभागी व्हावे, असे आवाहन देवगिरी प्रतिष्ठानचे संस्थापक अध्यक्ष व मुख्य संयोजक प्रा. प्रदीप रोडे यांनी केले आहे. अधिक माहितीसाठी ९५६१८१७४७४ या क्रमांकावर संपर्क साधावा.

# नवनियुक्त केंद्रप्रमुख व साधन व्यक्ती गौरव सोहळा संपन्न

माजलगाव । प्रतिनिधी

शिक्षणमहर्षी डॉ. पंजाबराव देशमुख राष्ट्रीय शिक्षक परिषद, माजलगाव यांच्या वतीने नवनियुक्त केंद्रप्रमुख तसेच समग्र शिक्षा अभियान अंतर्गत सेवेत कायम आदेश व वेतनश्रेणी प्राप्त झालेल्या साधन व्यक्ती व विषय तज्ञ यांच्या गौरवार्थ आयोजित करण्यात आलेला भव्य सत्कार समारंभ गुरुवार, दि. १६ जुलै २०२६ रोजी 'रयतभवन', तुळजाभवानी अर्बन, माजलगाव येथे उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला.

कार्यक्रमाच्या प्रारंभी ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून जिजाऊ वंदना घेण्यात आली. उपस्थित मान्यवरांच्या हस्ते नवनियुक्त केंद्रप्रमुख तसेच समग्र शिक्षा अभियानातील साधन व्यक्ती यांचा पुष्पहार, प्रतिमा व ग्रंथभेट देऊन यथोचित सत्कार करण्यात आला. सेवेत कायम आदेश व वेतनश्रेणी प्राप्त



झाल्याबद्दल सर्व सत्कारमूर्तींचे अभिनंदन करण्यात आले.

याप्रसंगी नवनियुक्त केंद्रप्रमुख पद्माकर शिंदे, नामदेव आपेट, अंबिका कुचेकर, राजेभाऊ घुबडे,अश्रुबा बोर्डे, प्रकाश शिंदे व साधन व्यक्ती लक्ष्मण पोटभरे,सचिन मोती, आयाज सिद्दिकी,अलका कदम, संजय राठोड, उद्धव लेंडगुळे, अभियंता भागवत वनवे, तसेच याप्रसंगी गडकिल्ले संवर्धन व ट्रेकिंग क्षेत्रातील उत्कृष्ट योगदानाबद्दल शिवराष्ट्र हायकर्स, कोल्हापूर यांच्याकडून 'शिवराष्ट्र भूषण' पुरस्काराने सन्मानित झालेल्या कृष्णा तौर यांचाही विशेष सत्कार करण्यात आला.

यावेळी वक्त्यांनी गुणवत्तापूर्ण शिक्षणासाठी शिक्षकांची भूमिका अत्यंत महत्त्वाची असल्याचे प्रतिपादन केले. नव्या जबाबदाऱ्या स्वीकारताना विद्यार्थीकेंद्रित शिक्षण, शैक्षणिक गुणवत्ता, नाविन्यपूर्ण अध्यापन आणि शाळेच्या सर्वांगीण विकासासाठी कटिबद्ध राहण्याचे आवाहन करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विजयसिंह सोळंके तर प्रमुख पाहुणे म्हणून अर्जुन वाघ, अशोकराव शेजुळ,गणेश ढीसले, सोमेश्वर मोरे,फुलचंद इंगोले, डी. के. चव्हाण,अरविंद देशमुख उपस्थित होते.

कार्यक्रमादरम्यान जिल्हा परिषद शाळांमधील दिवसेंदिवस घटत चाललेली विद्यार्थी संख्या हा गंभीर चिंतेचा विषय असल्याची भावना उपस्थित शिक्षकांनी व्यक्त केली. शाळांमध्ये प्रवेश वाढविण्यासाठी लोकसहभाग, पालकांशी सातत्यपूर्ण संवाद, गुणवत्तापूर्ण अध्यापन, आकर्षक शालेय उपक्रम आणि विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासावर भर देण्याची आवश्यकता अधोरेखित करण्यात आली. याप्रसंगी सर्व उपस्थित शिक्षकांनी जिल्हा परिषद शाळांमधील विद्यार्थी संख्या वाढविणे आणि प्रत्येक विद्यार्थ्याला गुणवत्तापूर्ण शिक्षण उपलब्ध करून देणे हा सामूहिक संकल्प केला. शिक्षणाची गुणवत्ता उंचावण्यासाठी एकजुटीने कार्य करण्याचा निर्धारही व्यक्त करण्यात आला.

कार्यक्रमास शिक्षक परिषदेचे पदाधिकारी, केंद्रप्रमुख, मुख्याध्यापक, शिक्षक, साधन व्यक्ती, विषय तज्ञ तसेच शिक्षणप्रेमी मोठ्या संख्येने उपस्थित होते. दिलीप धुमाळ यांनी सूत्रसंचालन, तालुकाध्यक्ष नारायण झोडगे यांनी प्रास्ताविक व मुकूंद सोळंके यांनी आभारप्रदर्शन केले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी पुरुषोत्तम जाधव, विलास शेजुळ,विनोद ठोंबरे,ज्ञानेश्वर थेटे, सुधाकर जाधव,उत्तम पवार, रामदास कापसे, हनुमान होके, गणेश घाटूळ,बालासाहेब काकडे,शरद नायबळ,विनोद गायकवाड, विकास गायकवाड, विजय कटारे, जीवन डोंगरे, कलीम शेख,अमोल गालफाडे,रवींद्र वळसे संतोष गिरे, गणेश दळवी यांनी परिश्रम घेतले. राष्ट्रगीताने कार्यक्रमाची सांगता झाली.

# ना.पंकजाताई मुंडेंनी दिलेल्या शब्दाप्रमाणे मदतीचा चेक घेऊन मयत विलास घुलेच्या पत्नी व कुटुंबियांची घेतली सांत्वनपर भेट

### न्यायासाठी शेवटपर्यंत सोबत राहण्याची दिली ग्वाही

केज । प्रतिनिधी

तालुक्यातील टाकळी गावचा युवक स्व. विलास घुलेच्या पत्नी व कुटुंबियांची राज्याच्या पर्यावरण व पशुसंवर्धन मंत्री ना.पंकजाताई मुंडे यांनी आज सांत्वनपर भेट घेऊन धीर दिला. दिलेल्या शब्दाप्रमाणे त्यांनी गोपीनाथ मुंडे प्रतिष्ठानच्या वतीने पाच लाखाचा मदतीचा धनादेश घुलेच्या पत्नीकडे सुपूर्द केला. न्यायासाठी शेवटपर्यंत सोबत राहण्याची ग्वाही त्यांनी यावेळी दिली.



मागील महिन्यात टाकळी- कदमवाडी (ता. केज) परिसरात झालेल्या एका घटनेत विलास घुले या युवकाचा हकनाक बळी गेला होता, त्याच्या दुर्दैवी मृत्यूमुळे घुले परिवारावर दुःखाचा डोंगर कोसळला होता. घुले परिवाराच्या दुःखात आणि न्यायाच्या लढाईत पाठिशी असल्याचे सांगत ना. पंकजाताई मुंडे यांनी त्याच्या परिवाराचे पालकत्व स्वीकारत गोपीनाथ मुंडे प्रतिष्ठान च्या वतीने पाच लाखाची मदत जाहीर केली होती. आज संध्याकाळी बीड कडे जाताना त्यांनी टाकळीत जाऊन घुले परिवाराची सांत्वनपर भेट घेतली आणि मदतीचा चेकही दिला. न्यायासाठी शेवटपर्यंत सोबत राहण्याची ग्वाही त्यांनी घुले कुटुंबास दिली.

### भोकरमध्ये तरुणाचा खून, तर नांदेडात घरात घुसून कुटुंबावर प्राणघातक हल्ला

नांदेड : नांदेड शहरासह जिल्ह्यात कायदा व सुव्यवस्थेला आव्हान देणाऱ्या दोन गंभीर घटना समोर आल्या आहेत. भोकर येथे एका २१ वर्षीय तरुणाचा गळा आवळून खून करण्यात आल्याचे शवविच्छेदन अहवालातून स्पष्ट झाले आहे, तर नांदेड येथील विमानतळ पोलिस ठाण्याच्या हद्दीत जुन्या भांडणाच्या कारणावरून एका कुटुंबावर चाकू व विटांनी जीवघेणा हल्ला करण्यात आला. या दोन्ही प्रकरणांत संबंधित पोलिस ठाण्यांमध्ये गुन्हे दाखल करण्यात आले असून पोलिस अधिक तपास करत आहेत. भोकर शहरातील अशोक कॉलनी भागातील रहिवासी लक्ष्मण गंगाधर जिंके (वय २१) या तरुणाचा अज्ञात कारणासाठी अज्ञात इसमाने गळा आवळून खून केल्याची घटना उघडकीस आली आहे. सुधा नदीच्या काठावर लक्ष्मण याचा मृतदेह आढळून आला होता.

जा.क./न.प./अंबड/नामांतर/२०२६/३२३
कार्यालय नगर परिषद, अंबड
दिनांक : १९/०५/२०२६

नांव बदलण्याचा
जाहिरनामा

अर्जदार श्री. सौ. श्रीमती: १) जनाबाई भिकाजी मगर (२) गगुबाई भिकाजी मगर

प्रकरण सिटी सर्वे नंबर ५४५ नं प घर नं २-८५ चे हस्तातरण करणे बाबत

येथे सर्व जनतेस या जाहिरनाम्याद्वारे रूळविण्यात येते की, सदरील अर्जदार नकाशात वरील न.प. मालमता घर क्र. (२-८५) दर्शविलेल्या प्रमाणे मोहल्ला इमारतीचे/जायेचे नांव बदलून घेऊ इच्छीतो ज्याची चतुःसिमा खालील प्रमाणे आहे. जर कोणास या बददल आक्षेप असेल तर त्यांनी हा जाहिरनामा प्रसिध्द झाल्यापासुन (१५) पंधरा दिवसाचे आत कार्यालय नगर परिषद, अंबड येथे लेखी आक्षेप सादर करावा, नसता मरेगती ही तक्रार ग्राहय धरली जाणार नाही.

चतुः सिमा
पुर्व :- जैन मंदिर
पश्चिम :- मच्छिंद्र वाळवे यांचे घर
दक्षिण : अशोक गोरे यांचे घर
उत्तर :- हिरालाल बीडकर यांचे घर

स्वाक्षरित/-
मुख्याधिकारी
नगर परिषद, अंबड

## पान ६ वरून...

### अंबाजोगाईतील पालखी

सोन्याचे दागिने पोलिसांनी हस्तगत केले आहेत.ही यशस्वी कामगिरी पोलीस अधीक्षक नवनीत काँवत, अपर पोलीस अधीक्षक चेतना तिडके आणि अंबाजोगाईचे सहाय्यक पोलीस अधीक्षक ऋषीकेश शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक शिवाजी बंटेवाड, अंबाजोगाई शहरचे पोलीस निरीक्षक शरद जोगदंड आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी केली आहे.स्थानिक गुन्हे शाखेच्या या कामगिरीचे सर्वस्तरातून कौतुक होत आहे.

### पिकांनी माना टाकायला सुरुवात

अलीकडील काळात मोठ्या कष्टाने शेतात राबणाऱ्या हाताला निसर्गाची साथ मिळत नाही. त्यामुळे शेतीव्यवसायाची शाश्वती शेतकऱ्यांना राहिली नाही. गतवर्षी अतिवृष्टी, गारपीट, रोगराईने पिकांचे नुकसान केले. आता यंदाची खरीप तरी साथ देईल,अशी अपेक्षा शेतकरी व्यक्त करीत आहेत.

### सोनम वांगचुक यांच्या

एकत्र येण्याची गरज आहे.

सोनम वांगचुक यांच्या उपोषणाकडे केंद्र सरकार जाणीवपूर्वक दुर्लक्ष करत असून, त्यांच्या मागण्यांबाबत कोणतीही ठोस भूमिका घेतली जात नसल्याचा आरोपही गित्ते यांनी केला. या निषेधार्थ आणि त्यांच्या आंदोलनाला पाठिंबा दर्शविण्यासाठी अंबाजोगाईत हे लाक्षणिक उपोषण आयोजित करण्यात आले आहे.

या उपोषणाला सामाजिक क्षेत्रातील ज्येष्ठ पत्रकार व कार्यकर्त्यांनीही पाठिंबा जाहीर केला आहे. यात पत्रकार दत्ता आंबेकर, महादेव गोरे मारुती जोगदंड, सय्यद नईम शेख फेरोज सखा पाटेकर, लहुजी शिंदे, राजेश वाहुळे, अशोक कोळी, संजय साळवे, ज्येष्ठ पत्रकार अ. र. पटेल, अनुरथ बाडे, महादेव पुजारी आणि गणेश गव्हाणे यांचा समावेश आहे.सामाजिक कार्यकर्ते, विविध संघटनांचे पदाधिकारी, युवक, विद्यार्थी आणि नागरिक मोठ्या संख्येने या उपोषणात सहभागी झाले होते.

### अमरसिंह पंडित यांच्या

दिपक आतकरे, गटशिक्षणाधिकारी नांदूरकर, रवी पवार, शंकर पवार, बाबुराव जाधव, खरेदी-विक्री संघाचे उपाध्यक्ष गणपत राठोड, लक्ष्मण लेंडगुळे, सरपंच कुंडलिक चव्हाण, पिकाजी राठोड, बंडू राठोड, सुरेश चव्हाण, अंबादास राठोड, पोपट चव्हाण, धनु राठोड यांच्यासह विद्यार्थी, पालक आणि ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.रामनगर तांड्याच्या विकासात हा महत्त्वाचा टप्पा ठरणार असून, शिक्षणासोबतच ग्रामीण भागातील मूलभूत सुविधा अधिक सक्षम करण्यासाठी अशा विकासकामांना सातत्याने प्राधान्य दिले जात असल्याची भावना कार्यक्रमात व्यक्त करण्यात आली.

### परळी, अंबाजोगाईत

ना. पंकजाताईंचा जनता दरबार पार पडला. या जनता दरबारात सकाळपासूनच नागरिकांनी गर्दी केली होती. रस्ते, पाणीपुरवठा, वीज वितरण, महसूल विभागातील प्रलंबित प्रकरणे आणि वैयक्तिक लाभाच्या योजना अशा विविध समस्या घेऊन नागरिक आले होते. यावेळी पंकजाताई मुंडे यांनी केवळ अर्ज स्वीकारले नाहीत, तर संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांना लगेच फोन करून जागेवर प्रश्नांचा निपटारा केला.

फेस टू फेस संवाद

जनता दरबारात ना. पंकजाताई मुंडे आलेल्या प्रत्येकाची समस्या नीट ऐकून घेत त्यावर लगेच तोडगा काढून फोन करतात, त्यांची ही शैली पाहून आपल्या समस्यांची गाऱ्हाणी घेऊन आलेल्या जनतेच्या चेहर्यावर समाधानाचे भाव उमटत होते. 'ताईंनी आमचं म्हणणं ऐकून घेतलं, फोन केला, आमचं काम झालं,' अशी भावना जनता दरबारात सहभागी नागरिकांनी व्यक्त केली. या जनता दरबाराला स्थानिक पदाधिकारी, कार्यकर्ते आणि विविध विभागांचे शासकीय अधिकारी उपस्थित होत.

### गरीबाच्या बालाजीच्या दर्शनासाठी

महाप्रसादाची व्यवस्था करून वारकरी सेवेची परंपरा जपली.

वारकऱ्यांच्या सेवेला विठ्ठलसेवेचे स्वरूप मानत रेडेकर परिवार अनेक वर्षांपासून अखंडपणे ही सेवा करत असून, त्यांच्या या उपक्रमामुळे वारकऱ्यांना विश्रांती, प्रेम आणि आत्मीयतेचा अनुभव मिळत असल्याची भावना वारकरी बांधवांनी व्यक्त केली.श्री शेत्र मच्छिंद्रनाथ देवस्थानच्या वतीने सालाबाद प्रमाणे याही वर्षी पायी दिंडी सोहळा निघाला पंढरपूरच्या दिशेने आष्टी शहरात आले असता ठिकठिकाणी मच्छिंद्रनाथाच्या पादुका रथाचे स्वागत विनायक गरडकर या भक्ताच्या वतीने प्लास्टिक घोंगटा वाटप मधुकर अण्णा मस्के यांच्या वतीने महाप्रसाद तर संदीप पोठरे यांच्या वतीने चहा नाष्टा देण्यात आला.

### जिल्हाधिकारी जॉन्सन यांनी घेतला

मोहिमांचा आढावा घेण्यात आला. यामध्ये छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व अभियान, ई-फेरफार, उन्हाळी ई-पीक पाहणी, आणि नवीन वाळू घाटांच्या प्रस्तावांचा समावेश होता. जिल्ह्यात सध्या ७२.६६ टक्के पूर्ण झालेल्या एसआयआर कामकाजाला १०० टक्क्यांवर नेण्यासाठी बीएलओ सहाय्यकांची संख्या वाढविण्याचे निर्देशही त्यांनी यावेळी दिले. नैसर्गिक आपत्तीअंतर्गत पीक नुकसानीचे अनुदान डीबीटीद्वारे थेट शेतकऱ्यांच्या खात्यात जमा करणे आणि प्रलंबित ई-केवायसी तातडीने पूर्ण करण्यावर भर देण्यात आला. जनतेच्या सोयीसाठी अधिकाऱ्यांनी आपल्या कार्यालयाच्या दर्शनी भागात भेटीचे वेळापत्रक लावणे आणि दौऱ्यावर जाताना गावकऱ्यांना पूर्वकल्पना देणे बंधनकारक असल्याचेही जिल्हाधिकारी श्री.जॉन्सन यांनी यावेळी सांगितले. महसूल प्रशासन अधिक पारदर्शक, जबाबदार आणि जनहिताभिमुख करण्यासाठी दिलेल्या सूचनांची

# फळ पिकांच्या संरक्षणासाठी शेतकरी सरसावले!

## • राज्यात नांदेड पहिले तर परभणीने पटकावला दुसरा क्रमांक

**परभणी । प्रतिनिधी**

**पुनर्रचित हवामान आधारित मृगबहार- २०२६ फळ पीक विमा योजनेला राज्यभरातील शेतकऱ्यांकडून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत असून, आतापर्यंत ८१ हजार ५२३ विमा अर्जांची नोंदणी झाली आहे. जिल्हानिहाय सहभागात नांदेड प्रथम, तर परभणी जिल्हा १२ हजार १६२ अर्जासह राज्यात द्वितीय क्रमांकावर आहे. जिल्ह्यातील अधिकाधिक शेतकऱ्यांनी फळ पिकांचे संरक्षण करण्यासाठी या योजनेचा लाभ घ्यावा, असे आवाहन कृषी विभागाने केले आहे.**



मागील वर्षीच्या मृगबहार २०२५ हंगामात राज्यभरातून ५२ हजार १२१ अर्ज प्राप्त झाले होते. यंदा त्यात २९ हजार ४०२ अर्जांची भर पडली असून, नोंदणीचे प्रमाण मागील वर्षाच्या तुलनेत सुमारे १५६ टक्क्यांपर्यंत पोहोचले आहे. यावरून शेतकऱ्यांचा फळ पीक विमा योजनेकडे वाढता कल स्पष्ट होत आहे. राज्य शासनाने २७ जून २०२६ रोजी काढलेल्या शासन निर्णयानुसार मृगबहार २०२६ फळ पीक विमा योजनेची अंमलबजावणी सुरू करण्यात आली. यंदा पारंपरिक द्राक्ष, पेरू, लिंबू, सीताफळ, मोसंबी, संत्रा, डाळिंब आणि चिकू या पिकांसोबत अंजीर आणि हळद या दोन नवीन पिकांचा प्रथमच समावेश करण्यात आला आहे. त्यामुळे विशेषतः हळद उत्पादक शेतकऱ्यांनी मोठ्या प्रमाणावर या योजनेत सहभाग नोंदविला आहे. जिल्हानिहाय सहभागात नांदेड जिल्हा १३ हजार ८७५ अर्जांसह प्रथम क्रमांकावर आहे. त्यानंतर परभणी १२ हजार १६२, हिंगोली ११ हजार ९१० आणि अहिल्यानगर ११ हजार ३५ अर्जांसह अनुक्रमे दुसरा, तिसरा आणि चौथा क्रमांकावर आहेत. विशेषतः हळद पिकाचा प्रथमच समावेश झाल्यामुळे परभणी, नांदेड आणि हिंगोली जिल्ह्यांतील शेतकऱ्यांनी मोठ्या प्रमाणावर विमा अर्ज दाखल केले आहेत. योजनेअंतर्गत अंजीर आणि सीताफळ या पिकांसाठी विमा अर्ज करण्याची अंतिम मुदत ३१ जुलै २०२६ असून, इतर सर्व पिकांसाठी अर्ज प्रक्रिया १४ जुलै २०२६ रोजी पूर्ण झाली आहे. बँकांमार्फत सादर होणाऱ्या अर्जांची नोंद अद्याप सुरू असल्याने अंतिम आकडेवारीमध्ये आणखी वाढ होण्याची शक्यता कृषी विभागाने व्यक्त केली आहे. योजनेतील सर्व अर्ज एनसीपीआयच्या ऑनलाइन पोर्टलद्वारे स्वीकारले जात आहेत. विमा घेतलेल्या प्रत्येक शेतकऱ्याने डिजिटल पीक पाहणी विहित मुदतीत पूर्ण करणे बंधनकारक आहे. अन्यथा संबंधित विमा अर्ज अपात्र ठरू शकतो, असा इशारा प्रशासनाने दिला आहे. दरम्यान, अंजीर व सीताफळ उत्पादक शेतकऱ्यांनी उपलब्ध मुदतीत अर्ज करून फळ पीक विमा योजनेचा लाभ घ्यावा आणि आपल्या पिकांना नैसर्गिक आपत्तीपासून आर्थिक संरक्षण मिळवावे, असे आवाहन कृषी विभागाने केले आहे.

### हळद पिकासाठी सर्वाधिक विमा अर्ज

योजनेअंतर्गत विविध फळ व नगदी पिकांसाठी विमा संरक्षित रक्कम निश्चित करण्यात आली आहे. त्यानुसार द्राक्षासाठी प्रति हेक्टर ३ लाख ८० हजार रुपये, हळदीसाठी १ लाख ८० हजार रुपये, डाळिंब व अंजीरसाठी प्रत्येकी १ लाख ६० हजार रुपये, तर मोसंबी व संत्र्यासाठी प्रत्येकी १ लाख रुपये विमा संरक्षण उपलब्ध आहे. या योजनेचा लाभ घेण्यासाठी शेतकऱ्यांना साधारण ५ टक्के विमा हप्ता भरावा लागतो. नोंदणीच्या आकडेवारीनुसार हळद पिकासाठी सर्वाधिक ४१ हजार ५९५ विमा अर्ज प्राप्त झाले आहेत. त्याखालोखाल संत्रा १० हजार २३७, तर डाळिंब ८ हजार ६३ अर्जांची नोंद झाली आहे.

# मागेल त्याला सौर कृषी पंप योजना, ७९३ कोटी निधी वितरणास मंजुरी




**मुंबई । प्रतिनिधी**

**मागेल त्याला सौर कृषी पंप योजनेसाठी राज्य सरकारच्या हिस्स्यापोटी ७९३.७९ कोटी रुपये इतका निधी महावितरण कंपनीस वितरीत करण्यास शासनाने मंजुरी दिली आहे. सन २०२६-२७ या आर्थिक वर्षासाठी मंजूर अंर्थसंकल्पीय तरतुदीमधून ही निधी दिला जात आहे. याबाबतचा शासन निर्णय ऊर्जा विभागाने जारी केला आहे.**

सौर कृषी पंप योजनेच्या अंतर्गत महावितरण कंपनीने सर्व वर्गवारीतील लाभार्थ्यांसाठी आस्थापित केलेल्या सौर कृषी पंपासाठी हा निधी अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनी मर्यादित, मुंबई यांना यांना उपलब्ध करून देण्यात आला आहे. शेतकऱ्यांना दिवसा, विश्वासार्ह व अखंडीत वीज पुरवठा करण्याचा या योजनेचा उद्देश आहे. त्यासाठी पारेषण विरहित सौर कृषी पंपांचे वितरण ५ वर्षाच्या कालावधीत ५ लाख पंप महावितरण कंपनीद्वारे आस्थापित करणे तसेच कृषी वितरण प्रणालीचे बळकटीकरण आणि क्षमतेत वाढ करणे व कृषी वितरण प्रणालीचे सौर ऊर्जीकरण केले जात आहे. सदर योजनेसाठी एकूण रकमेच्या अंदाजे ६० टक्के रक्कम बाजार कर्ज स्वरूपात्त एशियन इन्फ्रास्ट्रक्चर इन्व्हेस्टमेंट बँक द्वारे प्रचलित बाजार दराने घेऊन महावितरण कंपनीला उपलब्ध करुन शासनाने मान्यता दिली आहे. या योजनेअंतर्गत ४,८१७.९७ कोटी इतका निधी २०२४-२८ या वर्षात अर्थसंकल्पीय तरतुदीतून अनुदान स्वरुपात महावितरण कंपनीस दिला जात आहे. सन २०२५-२६ मध्ये महावितरण कंपनीने मागेल त्याला सौर कृषी पंप या योजनेतंर्गत सर्व वर्गवारीतील लाभार्थ्यासाठी आस्थापित केलेल्या सौर कृषी पंपांसाठी सरकारच्या हिस्स्यापोटी १,६९४ कोटी इतका निधी महावितरण कंपनीस वितरीत केला होता. तसेच, आणखी एका शासन निर्णयाच्या माध्यमातून १,३६१ कोटी निधी महावितरण कंपनीस उपलब्ध करुन दिला होता. या योजनेंतर्गत सर्व वर्गवारीतील लाभार्थ्यांसाठी आस्थापित केलेल्या ३,१७,११२ सौर कृषी पंपांसाठी सरकारच्या हिस्स्याचा उर्वरीत ७९३.७९ कोटी निधी उपलब्ध करून देण्याची विनंती केली होती. त्यानुसार कार्यवाही करण्यात आली आहे. हा निधी केवळ या योजनेसाठीच सन २०२६-२७ या आर्थिक वर्षासाठी खर्च करण्यात येईल, याची खातरजमा करण्यात यावी. याबाबतचा त्रैमासिक अहवाल सादर करण्याची जबाबदारी संचालक (अर्थ), महावितरण यांची राहील, असे शासन निर्णयात नमूद केले आहे. 'मागेल त्याला सौर कृषी पंप' योजनेत महाराष्ट्र देशात आघाडीवर आहे. राज्यात दररोज सुमारे १,५०० पंप बसवले जात आहेत. या योजनेमुळे सुमारे ४० लाख एकर क्षेत्र ओलिताखाली आले असल्याची माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी याआधी दिली आहे.

### मागेल त्याला सौर पंप योजना

या योजनेंतर्गत शेतकऱ्यांना ३,५ आणि ७.५ अश्वशक्ती क्षमतेचे पंप देण्यात येतात. जर १० अश्वशक्ती क्षमतेचा पंप बसवला तर वरील अडीच अश्वशक्तीचा खर्च स्वतः शेतकऱ्याला करावा लागतो. यासाठी शेतकऱ्याला १० टक्के खर्च करावा लागत असून ९० टक्के अनुदान केंद्र आणि राज्य सरकारकडून मिळते.



## भारतातील सर्वश्रेष्ठ देशी गीर गाय; जाणून घ्या वैशिष्ट्ये!

मागील काही काळात देशी गायीचे महत्व याबाबत जागरुकता निर्माण झालेली आहे. ग्राहकांमध्ये सुद्धा देशी गायीचे दूध यामुळे होणारे फायदे माहित झाल्यावर या दुधाची मागणी दिवसेंदिवस वाढत आहे. विशेषतः गीर गायीपासून मिळणाऱ्या दुधाला खूप मोठ्या प्रमाणात मागणी आहे.

**गीर गायचे ठिकाण** : गीर गाय ही भारतातील श्रेष्ठ देशी जात असून गुजरात राज्यातील काठेवाडच्या दक्षिणेकडील गीर टेकड्या व जंगल हा या जनावरांचा मूळ प्रदेश आहे. ही गाय प्रामुख्याने दूध उत्पादनासाठी पाळली जाते. या गायीला भोदली, गुजराती, सोर्थी, सुरती, काठियावारी आणि देशन या नावाने सुद्धा ओळखले जाते. गीर गायीपासून २ हे सर्वोत्तम प्रकारचे दूध मिळते. या गायीचे दूध आणि तूप आपल्या शरीरासाठी खूप फायदेशीर आहे.

**शरीर रचना** : सुमारे ८० टक्के गीर गायींचा रंग लाल असतो. कान पानांसारखे झुकलेले आणि दुमडलेले असतात. डोळे बदामाच्या आकाराचे असून डोके जड व नक्षीदार असून चेहरा लांबड असतो. गीर गायीच्या शेपटीचे टोक गुंफलेले आणि काळे असते. नर गायीची सरासरी उंची १५९ सेमी आणि सरासरी वजन ५४४ किलो इतके असते. मादी गीर गायीची सरासरी उंची १३० सेमी आणि सरासरी वजन ३१० किलोपर्यंत असू शकते.''

**वैशिष्ट्ये** : ही गाय जवळपास चार वर्षात प्रथम माजावर येते. या गायीचा दूध देण्याचा कालावधी ३०० दिवस असून सरासरी दूध उत्पादन १७०० लिटर असते. गायीची प्रति दिवस दूध उत्पादन क्षमता १० ते १२ लिटर एवढी आहे. ब्राझील मध्ये अधिक चांगले व्यवस्थापन यामुळे ही गाय प्रति दुग्ध पानाच्या कालावधीत सरासरी ३,५०० लिटर पर्यंत दूध उत्पादन देते हे सिद्ध झाले आहे. या गायीचे सरासरी आयुष्य १२ ते १५ वर्ष असते.


# मुख्यमंत्री बळीराजा पाणंद रस्ते योजनेत सुधारणा करा-आ.अभिमन्यू पवार

**मुंबई । प्रतिनिधी**

मुख्यमंत्री बळीराजा शेत पाणंद रस्ते योजनेची अधिक प्रभावी, सर्वसमावेशक आणि प्रत्यक्ष परिस्थितीला पूरक अंमलबजावणी व्हावी, यासाठी आमदार अभिमन्यू पवार यांनी महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांची भेट घेऊन योजनेच्या शासन निर्णयात आवश्यक सुधारणा करण्याची, तसेच आयडब्ल्यूएमएस ऑनलाइन प्रणालीमध्ये तातडीने तांत्रिक दुरुस्ती करण्याची मागणी केली. त्यानंतर महसूलमंत्री बावणकुळे यांनी आवश्यक त्या सुधारणा करण्याबाबत संबंधित अधिकाऱ्यांना निर्देश दिले.

कमी रुंदीच्या शेत पाणंद रस्त्यांनाही योजनेचा लाभ मिळण्याचा मार्ग मोकळा होणार आहे. मुख्यमंत्री बळीराजा शेत पाणंद रस्ते योजनेत रस्त्यांची मंजुरी, अंदाजपत्रक, तांत्रिक व प्रशासकीय मान्यता, मोजमाप पुस्तिका आणि देयक प्रक्रिया आयडब्ल्यूएमएस प्रणालीद्वारे राबविली जाते. मात्र, योजना सुरू झाल्यानंतर प्रत्यक्ष अंमलबजावणीदरम्यान अनेक तांत्रिक व धोरणात्मक अडचणी समोर आल्या आहेत. शासनाच्या नमुना अंदाजपत्रकांमध्ये ३० फूट रुंदीच्या पाणंद रस्त्यांचा आधार घेण्यात आला आहे. प्रत्यक्षात महसुली नकाशे आणि क्षेत्रीय परिस्थितीनुसार बहुतांश रस्त्यांची रुंदी केवळ १२ ते २० फूट आहे. मात्र, आयडब्ल्यूएमएस प्रणालीमध्ये सध्या २० फूट किंवा त्यापेक्षा अधिक रुंदीचे रस्तेच स्वीकारले जात असल्याने हजारो पात्र पाणंद रस्ते योजनेच्या लाभापासून वंचित राहत असल्याचे आमदार पवार यांनी महसूलमंत्री बावणकुळे यांच्या निदर्शनास आणून दिले.अनेक रस्त्यांवर आमदार स्थानिक विकास निधी, जिल्हा परिषद, पंचायत समिती किंवा इतर योजनांतून यापूर्वीच मातीकाम पूर्ण झालेले आहे.

# पाऊस कमी झाल्यास असे करा पीक व्यवस्थापन



**पिकांची उगवण समाधानकारक झाली असली, तरी पावसाच्या खंडामुळे जमिनीतील ओलावा झपाट्याने कमी होत आहे. त्यामुळे पुढील उपाय तातडीने करावेत. शेततळे, विहिरी, पाझर तलाव, सिमेंट बंधारे आदी उपलब्ध जलस्त्रोतांचा कार्यक्षम वापर करावा.**

**संरक्षित सिंचन** :

पावसाचा खंड आणि पीक वाढीच्या संवेदनशील अवस्थेनुसार सिंचन. ठिबक सिंचन, तुषार सिंचन पद्धतीचा वापर. सकाळी किंवा संध्याकाळी सिंचन करावे. पाण्याच्या चरांची दुरुस्ती करून पाण्याचा अपव्यय टाळावा.

**सेंद्रिय खतांचा वापर** : शेणखत, कंपोस्ट, गांडूळ खत, जिवाणू खते इ. सेंद्रिय घटकांच्या वापरामुळे जमिनीची पाणी धारण क्षमता वाढते. जमिनीत पुरेसा ओलावा असेल तरच रासायनिक खते वापरावीत. सूक्ष्म अन्नद्रव्ये, विद्राव्य खतांचा फवारणीद्वारे वापर.

**आच्छादनाचा वापर** : पीक अवशेष, सोयाबीन काड, भात किंवा गहू पेंढा, गिरिपुष्प, सुबाभूळ पाला इ. आच्छादन म्हणून वापर. जमिनीची सुपीकता राखली जाऊन सूक्ष्म जिवाणूंची संख्या वाढते. हेक्टरी ४ ते ५ टन पीक अवशेष किंवा २.५ ते ३ टन हिरव्या पाल्याचे आच्छादन फायदेशीर ठरते.

**विद्राव्य खत फवारणी** : पानावरील फवारणीच्या माध्यमातून अन्नद्रव्य पुरवठा केल्यास पिकाची पाण्याचा ताण सहन करण्याची क्षमता वाढते. पिकांच्या अवस्थेनुसार १ टक्का पोटॅशिअम नायट्रेट (१० ग्रॅम प्रति लिटर पाणी) १९:१९:१९ हे खत (१ टक्का) किंवा ००:००:५० या खताची (०.५ टक्का) फवारणी केल्यास पीक ६ ते ८ दिवस पाण्याचा ताण सहन करू शकते.

**आंतरमशागतीय उपाय** : पावसाच्या खंड काळात हलकी कोळपणी किंवा आंतरमशागत करावी. आवश्यकतेनुसार पिकांना मातीची भर द्यावी. पीक २१ दिवसांचे झाल्यास कोळपणी करावी. यामुळे जमिनीच्या भेगा बुजून बाष्पीभवन कमी होते, मातीची भर लागून मुळांची वाढ चांगली होते. सोयाबीन, ज्वारी १५ ते ४५ दिवस, मूग, उडीद, बाजरीमध्ये १५ ते ३० दिवस आणि कापूस ६० ते ७० दिवस तणमुक्त ठेवावे. पावसाच्या खंड काळात खोल मशागत, जास्त प्रमाणात नत्र खत देणे किंवा इतर ताण वाढविणारी कामे टाळावीत.

**बांधबंदिस्ती, जल संधारण सरी** : शेतातील बांध मजबूत ठेवावेत, जेणेकरून पावसाचे पाणी शेतातून वाहून जाणार नाही. सरी-वरंबा, रुंद वरंबा सरी पद्धत किंवा इतर जलसंधारण तंत्रांचा वापर करावा. या सरीमध्ये पावसाचे पाणी मुरते आणि अतिरिक्त पाणी सुरक्षितपणे शेताबाहेर जाते. पिकातील पहिली कोळपणी किंवा निंदणी झाल्यानंतर सोयाबीन सारख्या पिकात पहिल्या कोळपणी किंवा खुरपणीनंतर दर चार ओळींनंतर जल संधारण सरी काढावी. कपाशी किंवा तुरीसारख्या पिकांत एक ते दोन ओळींनंतर जल संधारण सरी काढावी.

**फळबाग** : ठिबक सिंचनाद्वारे आवश्यक तेवढेच पाणी द्यावे. झाडाभोवती आच्छादन करावे. बाग स्वच्छ ठेवून रोगग्रस्त वाळलेल्या फांद्या काढून नष्ट कराव्यात. १ टक्का बोर्डो मिश्रण किंवा १० टक्के बोर्डो पेस्टचा आवश्यकतेनुसार वापर करावा. पोटॅशिअम नायट्रेट (१ ते २ टक्का) फवारणी पाण्याच्या ताणाखाली उपयुक्त ठरू शकते. एकात्मिक अन्नद्रव्य व्यवस्थापनाचा अवलंब करावा.

**ऊस** : उसामध्ये प्रति हेक्टर ५ ते ६ टन पाचटाचे आच्छादन करावे. पाचट कुजण्यासाठी आवश्यक प्रमाणात युरिया, सिंगल सुपर फॉस्फेट आणि पाचट कुजविणारे सूक्ष्मजीव वापरावेत. ठिबक सिंचनाचा वापर करावा.

**कीड-रोगांचे निरिक्षण** : पावसाचे खंड पडल्यास ओलाव्याच्या कमतरतेमुळे तसेच कोरड्या वातावरणानंतर अचानक पाऊस झाल्यास पिकामध्ये कीड व रोगांचा प्रादुर्भाव वाढण्याची शक्यता असते. त्यासाठी पिकाचे नियमित निरिक्षण करून किडींचे सुरुवातीच्या अवस्थेत नियंत्रण करावे. सोयाबीनमध्ये खोडमाशी, पाने खाणाऱ्या अळ्या, स्पोडोप्टेरा, चक्रीभुंगा, तसेच कापसामध्ये तुडतुडे, मावा, पांढरी माशी, थ्रीप्स आणि गुलाबी बोंड अळीच्या प्रादुर्भावावर लक्ष ठेवावे. पावसानंतर अचानक आर्द्रता वाढल्यास सोयाबीनमध्ये अॅन्थ्रॅक्नोज, कॉलर रॉट, रिझोक्टोनिया, तसेच कापूस व तुरीमध्ये बुरशीजन्य रोगांचा प्रादुर्भाव होऊ शकतो. शेतामध्ये कामगंध सापळे, पिवळे व निळे चिकट सापळे लावून किडींचे निरीक्षण व नियंत्रण करावे. नियंत्रणासाठी कमी खर्चिक जैविक संवर्धकांचा अवलंब करावा. शेतातील मित्र कीटकांचे (लेडीबर्ड बीटल, क्रायसोपा, कोळी इ.) संरक्षण करावे. अनावश्यक रासायनिक कीटकनाशकांची फवारणी टाळावी. कीड किंवा रोगाने आर्थिक नुकसान पातळी ओलांडल्यानंतरच रासायनिक कीटकनाशकांचा वापर करावा. आर्थिक नुकसान पातळी लक्षात घेऊन एकात्मिक कीड-रोग व्यवस्थापनाचा अवलंब करावा.

**पेरणी न झालेल्या भागातील नियोजन** : ज्या भागात अद्याप पेरणीयोग्य पाऊस झालेला नाही, तेथील शेतकऱ्यांनी घाईने कोरड्या पेरण्या करू नयेत. पुढील समाधानकारक पावसानंतर कमी कालावधीत येणाऱ्या व स्थानिक परिस्थितीस अनुरूप वाणांची पेरणीसाठी निवड करावी. उशिरा पेरणीसाठी विद्यापीठ व कृषी विभागाच्या शिफारशीनुसार योग्य पिके व वाण वापरावेत. उशिरा पेरणीच्या परिस्थितीत हवामानानुसार योग्य पीक व आंतरपीक पद्धतीची निवड करणे अत्यंत महत्त्वाचे आहे.

**उशिरा पाऊस झाल्यास** : कापूस, सोयाबीन, तूर, बाजरी व सूर्यफूल लागवड शक्य. २० जुलैनंतर पाऊस, पेरणीस अधिक विलंब झाल्यास कमी कालावधीत परिपक्व होणारी व दुष्काळ सहनशील पिके : तूर, बाजरी, सूर्यफूल, एरंडी, कारळा व तीळ.

## दिन विशेष

### महत्वाच्या घटना

६४ई.पुर्व : रोममध्ये भीषण आग लागुन जवळजवळ सगळे शहर भस्मसात झाले. यादरम्यान सम्राट निरो लांब उभा राहुन आपले फिडल (तुणतुणे) वाजवत असल्याची कथा प्रसिद्ध आहे.
१८५२ : इंग्लंडमधे निवडणुकांत गुप्त मतदान वापरण्यास सुरूवात झाली.
१८५७ : मुंबई विद्यापीठाची स्थापना
१८७२ : ब्रिटन मध्ये निवडणुकांमध्ये मतदान करण्याचा अधिनियम लागू करण्यात आला. यापूर्वी खुल्या प्रकारे मतदान केलं जात असे.
१९१४ : महात्मा गांधींनी दक्षिण आफ्रिका सोडले.
१९२५ : अॅडॉल्फ हिटलरने 'माइन काम्फ' हे आत्मचरित्रात्मक पुस्तक प्रकाशित केले.
१९६८ : सांता क्लारा, कॅलिफोर्निया येथे 'इंटेल'कंपनीची स्थापना
१९७६ : मॉन्ट्रिअल ऑलिंपिक खेळात नादिया कोमानेसीने जिम्नॅस्टिक्स स्पर्धेत सर्वप्रथम १० पैकी १० गुण मिळवले.
१९८० : भारताने 'एस. एल. व्ही. ३' या अवकाशयानाद्वारे रोहिणी-१ या उपग्रहाचे अंतराळात यशस्वी प्रक्षेपण केले. या यशामुळे भारत हा उपग्रह सोडण्याची क्षमता असलेला जगातील सहावा देश बनला.
१९९६ : 'तामिळ टायगर्स'नी श्रीलंकेचा सैनिक तळ ताब्यात घेऊन सुमारे १२०० जवानांना ठार केले.
१९९६ : उद्योगपती गोदरेज यांना जपान सरकारतर्फे 'ऑर्डर ऑफ द रायझिंग सन' हा पुरस्कार प्रदान करण्यात आला.

### जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१६३५ : रॉबर्ट हूक इंग्लिश वैज्ञानिक (मृत्यू: ३ मार्च १७०३)
१८४८ : डब्ल्यू. जी. ग्रेस इंग्लिश क्रिकेटपटू (मृत्यू: २३ आक्टोबर १९१५)
१८४८ : इंग्लिश क्रिकेटपटू डब्ल्यू. जी. ग्रेस यांचा जन्म. (मृत्यू: २३ ऑक्टोबर १९१५)
१९०९ : भारतीय कवी, समीक्षक आणि शैक्षणिक बिश्नु डे यांचा जन्म. (मृत्यू: ३ डिसेंबर १९८३)
१९१० : भारतीय उद्योजिका दप्तेंद प्रमानिक यांचा जन्म. (मृत्यू: १५ डिसेंबर १९८९)
१९१८ : नेल्सन मंडेला तथा 'मदीबा' दक्षिण अफ्रिकेचे राष्ट्राध्यक्ष, नोबेल पारितोषिक विजेते (मृत्यू: ६ डिसेंबर २०१३)
१९२७ : 'गझलसम्राट' मेहदी हसन पाकिस्तानी गझलगायक (मृत्यू: १३ जून २०१२)
१९३५ : जयेन्द्र सरस्वती ६९ वे शंकराचार्य
१९५० : व्हर्जिन ग्रुपचे स्थापक रिचर्ड ब्रॅन्सन यांचा जन्म.
१९७१ : भारतीय गायक-गीतकार आणि अभिनेता सुखविंदर सिंग यांचा जन्म.
१९७२ : सौंदर्या कन्नड, तामिळ, तेलगू, मल्याळम आणि हिन्दी चित्रपट अभिनेत्री (मृत्यू: १७ एप्रिल २००४)
१९८२ : प्रियांका चोप्रा मॉडेल, अभिनेत्री, गायिका आणि 'मिस वर्ल्ड २०००' विजेती

### मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

१८१७ : इंग्लिश लेखिका जेन ऑस्टीन यांचे निधन. (जन्म: १६ डिसेंबर १७७५)
१८९२ : थॉमस कूक पर्यटन व्यवस्थापक (जन्म: २२ नोव्हेंबर १८०८)
१९६९ : 'लोकशाहीर' अण्णाभाऊ साठे लेखक, कवी व समाजसुधारक (जन्म: १ ऑगस्ट १९२०)
१९८९ : डॉ. गोविन्द केशव भट भांडारकर प्राच्यविद्या संशोधन संस्थेचे संचालक, मराठी, संस्कृत व इंग्रजी लेखक (जन्म: )
१९९४ : डॉ. मुनीस रझा ख्यातनाम शिक्षणतज्ञ, दिल्ली विद्यापीठाचे कुलगुरू, जवाहरलाल नेहरू विश्वविद्यालयाचे एक संस्थापक (जन्म:)
२००१ : पद्मिनीराजे माधवराव पटवर्धन सांगलीच्या राजमाता (जन्म:)
२००१ : रॉय गिलख्रिस्ट कसोटी क्रिकेटमधील भेदक वेगवान गोलंदाज म्हणून कारकीर्द गाजवलेले वेस्ट इंडीजचे वादग्रस्त कसोटीपटू (जन्म: २८ जून १९३४)
२०१२ : राजेश खन्ना चित्रपट अभिनेते, निर्माते आणि लोकसभा सदस्य (जन्म: २९ डिसेंबर १९४२)
२०१३ : भारतीय कवी, गीतकार, आणि अभिनेते वाली यांचे निधन. (जन्म: २९ ऑक्टोबर १९३१)
२०१७ : सुप्रसिद्ध भारतीय कवी, संस्कारकार, कथाकार, उपन्यासकार आणि सहृदय समीक्षक अजित शंकर चौधरी यांचे निधन.







# खुर्ची जप्तीच्या भीतीने जिल्हाधिकाऱ्यांचे दालन तीन तास कुलूपबंद

छत्रपती संभाजीनगर । प्रतिनिधी

नागरिकांसाठी चोवीस तास सुरू असलेले जिल्हाधिकाऱ्यांचे दालन गुरूवारी (दि.१६) न्यायालयाने काढलेल्या आदेशामुळे तब्बल तीन तास कुलूपबंद होते. फुलंब्री तालुक्यातील वाकोद लघु पाटबंधारे प्रकल्पासाठी संपादित झालेल्या जमिनीचा मोबदला न्यायालयाच्या आदेशानंतरही अदा न झाल्याने जप्तीच्या आदेशाची अंमलबजावणी करण्यासाठी बेलिफ, प्रकल्पग्रस्त शेतकरी आणि त्यांचे वकील जिल्हाधिकारी कार्यालयात दाखल झाले.

जिल्हाधिकाऱ्यांचे दालन बंद असल्याने जप्तीची कार्यवाही पुढे सरकू शकली नाही. अखेर बेलिफ यांनी पंचनामा करून प्रशासनाकडे नोटीस सुपूर्द करण्याची प्रक्रिया पूर्ण केली. या संपूर्ण घडामोडीमुळे जिल्हाधिकारी कार्यालयात तीन तास वरिष्ठ अधिकारी, कर्मचारी आणि पोलिसांची सतत धावपळ सुरू होती.





फुलंब्री तालुक्यातील लिहा येथील शेतकरी बजरंग हरिचंद ताटू यांची सुमारे १६ एकर जमिनीचे १९९६ मध्ये जलसंपदा विभागाच्या प्रकल्पासाठी संपादन करण्यात आले. मात्र मोबदला न मिळाल्याने सुमारे १५ वर्षांपूर्वी त्यांनी न्यायालयात याचिका दाखल केली. न्यायालयाने ६ ऑगस्ट २०२२ रोजी त्यांच्या बाजूने निकाल देत २ कोटी २२ लाख ६१ हजार १९ रुपये मोबदला देण्याचे आदेश दिले. मात्र आदेशानंतरही मोबदला न मिळाल्याने जानेवारी २०२६ मध्ये न्यायालयाकडून वॉरंट बजावण्यात आले होते.

त्यावर प्रशासनाने लेखी पत्र सादर करत चार महिन्यांत भरपाईची रक्कम अदा करण्याचे आश्वासन देण्यात आले होते. त्यानंतरही अद्यापपर्यंत ताटू यांना जमिनीचा मोबदला मिळालेला नाही. याप्रकरणी न्यायालयाने शासनाचे प्रतिनिधी जिल्हाधिकाऱ्यांच्या ताब्यातील चल मालमत्तेवर जप्तीचे वॉरंट बजावले. या आदेशाची अंमलबजावणी करण्यासाठी गुरूवारी दुपारी न्यायालयाच्यावतीने बेलिफसह प्रकल्पग्रस्त शेतकरी आणि त्यांचे वकील जिल्हाधिकारी कार्यालयात दाखल झाले. मात्र जिल्हाधिकाऱ्यांचे दालन कुलूपबंद होते. दरम्यान सामान्य प्रशासनच्या उपजिल्हाधिकारी संगीता राठोड यांनी मोबदल्याची रक्कम अदा करण्यासाठी चार आठवड्यांची मुदत देण्याची विनंती केली. मात्र प्रकल्पग्रस्तांचे वकील विरेंद्र बारहाते यांनी त्याला विरोध दर्शवला. त्यानंतर जप्तीची कारवाई सुरू करण्यात आली. मात्र सुमारे तीन तास प्रतीक्षा करूनही दालन न उघडल्याने पंचनामा करण्यात आला. त्यानंतर सायंकाळी सुमारे ५.१५ वाजता जिल्हाधिकारी विनय गौडा जी. सी. कार्यालयात आले. त्यानंतर त्यांनी संबंधित अधिकाऱ्यांकडून संपूर्ण प्रकरणाचा आढावा घेतला. दरम्यान प्रकल्पग्रस्त बजरंग ताटू यांनी, ३१ वर्षांत एक रुपयाचाही मोबदला मिळाला नाही. या प्रतीक्षेत माझ्या दोन भावांचे निधन झाले. अजून किती वाट पाहायची? असा संतप्त सवाल केला. जप्तीची कारवाई टाळण्यासाठी जिल्हाधिकाऱ्यांचे दालन बंद ठेवण्यात आल्याचा आरोप करत प्रकल्पग्रस्तांचे वकील ॲड. बारहाते यांनी न्यायालयात अवमान याचिका दाखल करण्याचा निर्णय घेतला आहे. तसेच जप्तीच्या आदेशाची पुन्हा अंमलबजावणी करण्याची मागणीही न्यायालयाकडे करण्यात येणार असल्याचे त्यांनी सांगितले.

## धावत्या बसने पेट घेतला, कार चालकामुळे प्रवाशांचे जीव वाचले

छत्रपती संभाजीनगर । प्रतिनिधी

संभाजीनगरहून इचलकरंजीकडे जाणाऱ्या धावत्या बसने अचानक पेट घेतला. ही बाब बसच्या पाठीमागे असलेल्या कारचालकाच्या लक्षात आल्याने त्याने तत्काळ चालकासह प्रवाशांना याची माहिती दिली. प्रवाशांनी बसमधून उतरून सुरक्षितस्थळी धाव घेतली. ही घटना पांढरी पिंपळगाव येथे शुक्रवारी (दि.१७) सकाळी ८.३० च्या सुमारास घडली.



संभाजीनगर ते इचलकरंजी सकाळी आणि सायंकाळी अशा दोन बस रोज धावतात. शुक्रवारी सकाळी ७.३० वाजता इचलकरंजी आगाराची बस क्रमांक एम एच ०९ एफ एल ८१३४ संभाजीनगरहून इचलकरंजीकडे जात असताना पांढरी पिंपळगाव येथे बसमधून धूर निघत असल्याचे पाठीमागून येणाऱ्या कारचालकाच्या निर्दशनास आले. त्यांनी ही माहिती चालकासह प्रवाशांना दिली.

चालकाने बस बाजूला घेतली व प्रवाशी खाली उतरविले. काही प्रवासी संकटकालीन दरवाज्यातून बाहेर काढले. गाडीने अचानकच जास्त पेट घेतल्याने संपूर्ण गाडी जळालेली आहे. बस मध्ये ३८ प्रवासी असून सदर घटनेमध्ये चालक वाहक अथवा कोणत्याही प्रवाशाला इजा झालेली नाही. घटनेची माहिती मिळताच संभाजीनगर येथील यंत्र अभियंता व त्यांचे सहकारी घटनास्थळी रवाना झाले आहेत.



## एकनाथ महाराज पालखी सोहळा धाराशिव जिल्ह्यात दाखल

धाराशिव । प्रतिनिधी

पंढरीच्या आषाढी एकादशीच्या सोहळ्यासाठी निघालेला श्रीसंत एकनाथ महाराज पालखी सोहळा धाराशिव जिल्ह्यातील दांडेगाव (ता. भूम) येथे दाखल झाला असून. यावेळी भाविकांनी सोहळ्याचे जोरदार स्वागत करून नाथांच्या पादुकांची समाज आरती मोठ्या उत्साहात केली. गावातील प्रत्येक भाविकांनी आपापल्यापरीने भाजी भाकरी एकत्र करून वारकऱ्यांची भोजन व्यवस्था केली होती.

परिसरातील भाविकांनी रिंगण सोहळ्याची जय्यत तयारी केली. श्री संत एकनाथ महाराज पालखी सोहळ्याचा मुक्काम गुरुवारी ऐतिहासिक खर्डा किल्ल्याच्या पायथ्याशी झाला. सकाळी सोहळा दहाव्या मुक्कामासाठी अंतरवाली, तिंत्रज मार्गे दांडेगाव येथे सायंकाळी दाखल झाला. यावेळी दांडेगाव येथील सरपंच पांडुरंग भोगील, पंचायत समिती माजी सभापती अण्णासाहेब भोगील, उपसरपंच संजय भोगील, पोलिस पाटील विकास भोगील यांच्यासह भाविकांनी पालखी सोहळ्यातील आलेल्या वारकऱ्यांचे स्वागत करून नाथांच्या पादुकांचे पूजन केले.

मारुती मंदिरासमोर नाथाच्या पादुकांची समाज आरती मोठ्या उत्साहात करण्यात आली. यावेळी परिसरातील महिला भाविकांची गर्दी मोठ्या प्रमाणावर होती. सोहळ्यात आलेल्या हजारो वारकऱ्यांनी व महाराज मंडळींनी टाळ मृदंगाच्या तालावर भजन सुरू करताच भाविकांनी भानुदास एकनाथ जयघोष केला. शुक्रवारी नाथांच्या सोहळ्याचे तिसरे रिंगण नांगरडोह येथे आयोजित करण्यात आले.

# चिमुकल्यांच्या चेहऱ्यावर स्मितहास्य फुलवणारे माणुसकीचा जिवंत झरा म्हणजे पोलीस बाबा बडे

पाथर्डी प्रतिनिधी

समाजात काही माणसे अशी असतात ज्यांची ओळख त्यांच्या पदामुळे होत नाही तर त्यांच्या हृदयात जपलेल्या माणुसकीमुळे होते त्यांच्या हातून होणारी मदत ही केवळ दान नसते तर ती एखाद्याच्या आयुष्यात आशेचा दिवा पेटवणारी असते अशा व्यक्तींची नावे वर्तमानपत्रात झळकली नाहीत तरी त्यांच्या कार्याचा सुगंध अनेकांच्या मनात कायमचा दरवळत राहतो पाथर्डी पोलिस ठाण्यात कार्यरत असलेले हेड कॉन्स्टेबल बाबासाहेब बडे हे असेच एक संवेदनशील व्यक्तिमत्त्व कर्तव्य बजावताना कायद्यापुढे कठोर पण गरजवंतांच्या अश्रूंशी संवाद साधताना अंतःकरणाने हळवे अनाथ दिव्यांग मतिमंद या शब्दांत वेदना आहेत आयुष्याच्या वाटेवर ज्यांच्या डोक्यावर मायेचा हात नाही अशा मुलांच्या चेहऱ्यावर आनंद फुलवणे हीच खरी ईश्वरसेवा आहे या भावनेतून बाबासाहेब बडे यांनी पाथर्डी येथील नवोदय अनाथ व मतिमंद विद्यालयात जाऊन विद्यार्थ्यांना खाऊ कपडे गणवेश शालेय साहित्य आणि इतर आवश्यक वस्तूंचे वाटप केले एवढेच नव्हे तर संस्थेच्या सेवाकार्यासाठी सुमारे ५५ हजार रुपयांची आर्थिक मदतही दिली या उपक्रमाची सर्वात मोठी गोष्ट म्हणजे यामागे प्रसिद्धीचा कसलाही मोह नव्हता छायाचित्रांची गर्दी नव्हती सोशल मीडियावरील प्रदर्शन नव्हते टाळ्यांचा गजर नव्हता होती ती फक्त एका संवेदनशील मनाची निःस्वार्थ भावना मुलांच्या डोळ्यांत जेव्हा आपुलकीचा हात दिसतो तेव्हा त्यांना पैशांपेक्षा मायेची श्रीमंती अधिक मोठी वाटते पोलीस बाबासाहेब बडे यांनी त्या प्रत्येक बालकाच्या डोक्यावर ठेवलेला हात म्हणजे त्यांच्यासाठी आयुष्यभराची जपणूक ठरणारा आशीर्वाद होता चिमुकल्यांच्या चेहऱ्यावर उमटलेले निष्पाप हास्य हे कोणत्याही पुरस्कारापेक्षा मोठे होते खाकी वर्दी म्हणजे केवळ शिस्त कायदा आणि कठोरता नव्हे तर समाजाच्या दुःखात सहभागी होणारे हृदयही असते हे त्यांनी आपल्या कृतीतून दाखवून दिले समाजातील वंचित अनाथ आणि दिव्यांग घटकांप्रती असलेली त्यांची सामाजिक बांधिलकी ही केवळ कौतुकाचा विषय नाही तर अनुकरणप्रिय आदर्श आहे स्वकेंद्रित युगात वंचित पीडित दुर्लक्षित घटकांच्या डोळ्यात आनंद फुलवण्यासाठी स्वतःचा वेळ पैसा व भावना खर्च करणारी माणसेच समाजाचा खरा आधार असतात अशी माणसे कोणत्याही पुरस्काराची अपेक्षा ठेवत नाहीत कारण त्यांना मिळणारा सर्वात मोठा सन्मान म्हणजे निराधारांच्या चेहऱ्यावर उमटणारे हसू होय चंदनाचा सुगंध कधी लपून राहत नाही त्याचप्रमाणे निस्वार्थ सेवाही कधी दडून राहत नाही ती शांतपणे समाजाच्या मनात घर करते आणि अनेकांना माणुसकीचा मार्ग दाखवते पोलीस कॉन्स्टेबल बाबासाहेब बडे यांनी केलेली ही कृती केवळ मदत नसून ती माणुसकीवरचा विश्वास अधिक दृढ करणारी आणि समाजाला संवेदनशीलतेची नवी दिशा देणारी ठरली आहे अशा देवदूतांमुळेच अजूनही जगात माणुसकी जिवंत असल्याचा दिलासा मिळतो.



## परळी नाक्यावरील भीषण अपघातात गंगाखेड नगरपरिषदेचे दोन कर्मचारी जागीच ठार

गंगाखेड । प्रतिनिधी

शहरातील परळी नाका परिसरातील महाराणा प्रताप चौक येथे गुरुवारी दि. १६ सायंकाळी सुमारे ५ वाजण्याच्या सुमारास झालेल्या भीषण अपघातात गंगाखेड नगरपरिषदेचे दोन कर्मचारी जागीच ठार झाले. मोटारसायकल आणि ट्रक यांच्यात समोरासमोर झालेल्या धडकेत हा दुर्दैवी अपघात घडला.

मिळालेल्या माहितीनुसार, नगरपरिषदेच्या पाणीपुरवठा विभागातील कर्मचारी शेख मुनवर शेख छोटूमिया (वय ४५) व नगरपरिषदेतील सेवक संतोष प्रल्हादराव साळवे (वय ५०) हे एमएच-२२-ए एक्स-०५७४ क्रमांकाच्या मोटारसायकलवरून परळी नाका येथील एका हॉटेलमध्ये चहा घेतल्यानंतर निघाले होते.

त्याचवेळी परभणीकडे जाणारा एमएच-३८-एक्स-९९७७ क्रमांकाचा ट्रक आणि त्यांच्या मोटारसायकलीची समोरासमोर जोरदार धडक झाली.धडकेनंतर दोघेही ट्रकच्या चाकाखाली सापडल्याने त्यांचा जागीच मृत्यू झाला. दोघांच्याही डोक्याला गंभीर दुखापत झाली असून, एका मृताच्या पोटावरून ट्रक गेल्याचे प्रत्यक्षदर्शींनी सांगितले.काही क्षणांतच घडलेल्या या भीषण अपघातामुळे परिसरात एकच खळबळ उडाली. घटनेची माहिती मिळताच गंगाखेड पोलिसांनी तात्काळ घटनास्थळी धाव घेत वाहतूक सुरळीत केली. त्यानंतर दोन्ही मृतदेह गंगाखेड उपजिल्हा रुग्णालयात शवविच्छेदनासाठी हलविण्यात आले. शवविच्छेदनाची प्रक्रिया सुरू असून, गंगाखेड पोलीस ठाण्यात अपघाताची नोंद करण्याची प्रक्रिया सुरू होती. या दुर्दैवी घटनेमुळे नगरपरिषद कर्मचारी व शहरात शोककळा पसरली आहे.

# वाळूची वाहतूक करणाऱ्या वाहनांसह २२.१७ लाख रुपयांचा मुद्देमाल जप्त

हिंगोली । प्रतिनिधी

जिल्ह्यात अवैध गौण खनिज वाहतुकीविरुद्ध पोलिसांनी दोन ठिकाणी मोठी कारवाई केली आहे. हट्टा आणि औंढा नागनाथ पोलिस ठाण्याच्या हद्दीत झालेल्या या कारवाईत अवैध मुरूम आणि वाळूची वाहतूक करणाऱ्या वाहनांसह एकूण २२.१७ लाख रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. या प्रकरणी चौघांवर मंगळवारी गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

औंढा नागनाथ येथील एका पेट्रोलपंपासमोर टिप्परमधून अवैध वाळू वाहतूक केली जात असल्याची माहिती गुन्हे शाखेला मिळाली होती. त्यावरून पोलिस निरीक्षक मोहन भोसले, उपनिरीक्षक दिलीप मोरे, जमादार भुजंग कोकरे, नितीन गोरे, साईनाथ कंठे, इंगोले, यांच्या पथकाने मंगळवारी पहाटेच्या सुमारास वाहनांची तपासणी केली.

यामध्ये एका टिप्परची तपासणी केली असता त्यात वाळू आढळून आली. पोलिसांनी टिप्पर व वाळू असा १४.१५ लाख रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. या प्रकरणी जमादार कोकरे यांच्या तक्रारीवरून टिप्पर चालक अंबादास राम राठोड (रा. शिरकुटी ता. जि. वाशिम) टिप्पर मालक अक्षय भुसांडे (रा. हिंगोली) यांच्या विरुध्द औंढा नागनाथ पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे. पोलिस उपनिरीक्षक अमोल इंगोले पुढील तपास करीत आहेत. या सोबतच अवैध गौण खनीज उत्खनन व वाहतुकीच्या अन्य एका घटनेमध्ये वसमत तालुक्यातील बाराशिव ते करंजाळा मार्गावर तलाठी गजानन शिंदे यांच्या पथकाने वाहनांची तपासणी केली. यामध्ये एका ट्रॅक्टरमधून अवैधरीत्या मुरूम वाहतूक केला जात असल्याचे स्पष्ट झाले. त्यावरून ट्रॅक्टर व मुरुम असा ८.०२ लाख रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. या प्रकरणी तलाठी शिंदे यांच्या तक्रारीवरून हट्टा पोलिस ठाण्यात चालक राजू कदम, अर्जुन कदम यांच्या विरुध्द गुन्हा दाखल झाला आहे. उपनिरीक्षक शेख पुढील तपास करीत आहेत.



## सायबर फसवणूक झाल्यास १९३० वर संपर्क साधा - पो.नि.प्रमोद पाटील

लासूर स्टेशन । प्रतिनिधी

बनावट कॉल, फिशिंग लिंक, बनावट बँक संदेश आणि सोशल मीडियावरील फसवणुकीपासून सावध राहण्याचे आवाहन पोलिस निरीक्षक प्रमोद पाटील यांनी केले. ओटीपी, सीव्हीव्ही, एटीएम पिन किंवा बँक खात्याची गोपनीय माहिती कोणालाही देऊ नये. सायबर गुन्ह्याचा बळी ठरल्यास तातडीने राष्ट्रीय सायबर हेल्पलाइन १९३० वर संपर्क साधून तक्रार नोंदवावी, असे त्यांनी सांगितले.



मराठवाडा शिक्षण प्रसारक मंडळ संचलित छत्रपती शाहू महाविद्यालयात सायबर गुन्हेगारी जनजागृती अभियानांतर्गत विशेष व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. बाळासाहेब पवार होते. प्रमुख पाहुणे म्हणून शिल्लेगाव पोलिस ठाण्याचे पोलिस निरीक्षक प्रमोद पाटील, पोलिस उपनिरीक्षक गणेश काळे व न्यू हायस्कूलचे मुख्याध्यापक सुनील सोमवंशी उपस्थित होते. पोलिस उपनिरीक्षक गणेश काळे यांनी अनोळखी मोबाईल वापरणे टाळावे, सापडलेला मोबाईल पोलिसांकडे जमा करावा तसेच मोबाईलचा पासवर्ड व वैयक्तिक माहिती कोणालाही देऊ नये, असा सल्ला दिला.

# कळमनुरीत गोळीबार; १ ठार

हिंगोली । प्रतिनिधी

शहरातील जुना बसस्थानक परिसरात दोन गटांतील जुन्या वादाने हिंसक रूप घेतले. यावेळी एका गटाने केलेल्या गोळीबारात एक जण ठार तर चौघे जखमी झाले. या घटनेमुळे शहरात तणावाचे वातावरण निर्माण झाले होते. पोलिसांनी तातडीने कारवाई करीत शिंदे सेनेच्या एका नगरसेवकासह १५ जणांना ताब्यात घेतले.



शहरात मागील काही दिवसांपासून दोन गटांत वाद होत होते. हा वाद रात्री उफाळून आला. जुना बसस्थानक परिसरात लुकमान सिद्दीकी व शेख शकील गट समोरासमोर आले. यामध्ये शकील गटातील एकाने गावठी पिस्तुलद्वारे गोळीबार केला. या गोळीबारात लुकमान सिद्दीकी (वय ३८) यांचा मृत्यू झाला तर ओसामा सिद्दीकी, सारिया सिद्दीकी, इम्रान पठाण, मेहराज पठाण हे जखमी झाले. घटनेची माहिती मिळताच पोलिस निरीक्षक जमीर नाईक यांनी घटनास्थळी पोहचत जखमींना रुग्णालयात हलवले. घटनेचे गंभीर्य घेत पोलिस अधीक्षक श्रेणिक लोढा, अप्पर पोलिस अधीक्षक कमलेश मीना, पोलिस उपाधीक्षक कुंदनकुमार वाघमारे, पोलिस निरीक्षक मोहन भोसले यांनी घटनास्थळी तत्काळ भेट दिली. याप्रकरणी इम्रान पठाण यांच्या फिर्यादीवरून आरोपी शेख शकील, शेख जम्मू, शेख जमीर, शेख समीर, अजहर पठाण, शाहीन नाईक, फयुम नाईक, शेख फारूक, शेख शहबाज, सय्यद फारूक, मुस्तकीम, इम्रान खान, शिबगत ऊर्फ शिब्बू तसेच शिवसेना शिंदे गटाचे नगरसेवक किशोर भालेराव या आरोपींविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला.

# अवैध वाळू उपशात प्रशासनाचे हात बरबटलेले, नियोजन समितीच्या बैठकीत आमदार विटेकर यांचा प्रशासनावर निशाणा

परभणी । प्रतिनिधी

जिल्ह्यात सुरू असलेल्या अवैध वाळू उपशाच्या मुद्द्यावर मंगळवारी झालेल्या जिल्हा नियोजन समितीच्या बैठकीत अभूतपूर्व खडाजंगी पहायला मिळाली. जिल्हाभरात वाळू माफियांकडून सुरू असलेल्या बेकायदेशीर वाळू उत्खननाला महसूल आणि पोलिस प्रशासनाचेच अभय मिळत असल्याचा गंभीर आरोप करत आ.राजेश विटेकर यांनी प्रशासनावर थेट निशाणा साधला. तलाठ्यापासून जिल्हाधिकाऱ्यांपर्यंत सर्वांचे हात बरबटले आहेत, असा गंभीर आरोप करत त्यांनी प्रशासनाच्या भूमिकेवर कठोर प्रश्नचिन्ह उपस्थित केले.

जिल्हाधिकारी कार्यालयातील सभागृहात पालकमंत्री मेघना साकोरे-बोर्डीकर यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीस आ.राजेश विटेकर, आ.सईद खान, आ.रत्नाकर गुट्टे, जिल्हाधिकारी संजयसिंह चव्हाण, मुख्य कार्यकारी अधिकारी नतिशा माथूर, पोलिस अधीक्षक पंकज कुमावत तसेच विविध विभागांचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

जिल्ह्याच्या विकास आराखड्याबरोबरच विविध प्रलंबित प्रश्नांवर चर्चा अपेक्षित असतानाच अवैध वाळू उपशाचा मुद्दा बैठकीचा केंद्रबिंदू ठरला. आ. विटेकर यांनी जिल्ह्यातील विविध नद्यांमधून दिवसाढवळ्या आणि रात्रीच्या अंधारात मोठ्या प्रमाणात अवैध वाळू उपसा सुरू असल्याचा आरोप केला. महसूल आणि पोलीस यंत्रणेला ही बाब माहिती असूनही कारवाई होत नसल्याने वाळू माफियांचे मनोबल वाढले आहे, असे ते म्हणाले.

जिल्ह्यात खुलेआम वाळू चोरी होत असेल, तर वाळू घाटांचे लिलाव करण्याची गरज तरी काय? सरकारने लिलाव प्रक्रिया बंद करून ज्याला हवी त्याने वाळू चोरून न्यावी, अशीच परवानगी द्यावी, असा उपरोधिक टोला त्यांनी लगावत प्रशासनाच्या निष्क्रियतेवर सडकून टीका केली. त्यांच्या या आरोपांवर पालकमंत्री मेघना साकोरे-बोर्डीकर यांनी तातडीने दखल घेतली. अवैध वाळू उत्खनन हा अत्यंत गंभीर विषय असून महसूल व पोलिस विभागाने समन्वय साधत कठोर कारवाई करावी, अशा स्पष्ट सूचना त्यांनी अधिकाऱ्यांना दिल्या.

जिल्ह्यात कोणत्याही परिस्थितीत वाळू माफियांना पाठीशी घालण्याचा प्रकार खपवून घेतला जाणार नसल्याचेही त्यांनी स्पष्ट केले. बैठकीत गंगाखेडचे आमदार रत्नाकर गुट्टे यांनीही प्रशासनाच्या कार्यपद्धतीवर तीव्र नाराजी व्यक्त केली. गंगाखेड तहसील कार्यालय परिसरात काही व्यक्ती उघडपणे मद्यपान करत बसतात. पोलिस ठाण्यापासून अगदी जवळच हा प्रकार सुरू असताना पोलिसांची दखल का घेतली जात नाही, असा सवाल त्यांनी उपस्थित केला. त्यामुळे कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न गंभीर बनत असल्याचे त्यांनी सांगितले. याशिवाय गंगाखेड तालुक्यात सायंकाळी सहा ते रात्री दहा या वेळेत होणाऱ्या वीज भारनियमनावरही त्यांनी संताप व्यक्त केला. दिवसभर शेतात कष्ट करणाऱ्या महिला रात्री घरी परतल्यानंतर स्वयंपाकासह घरातील कामे करतात. अशा वेळी वीजपुरवठा खंडित होणे अन्यायकारक असून हे जाचक भारनियमन तातडीने बंद करावे, अशी मागणी त्यांनी केली. आ.सईद खान यांनीही अवैधरित्या साठवून ठेवलेल्या वाळूच्या साठ्यांचा मुद्दा उपस्थित केला. जिल्ह्यात मोठ्या प्रमाणावर वाळूचे बेकायदेशीर साठे निर्माण झाले असून अशा साठेबाजांवर कोणती कारवाई करण्यात आली आहे, असा थेट प्रश्न त्यांनी प्रशासनाला विचारला. केवळ लहान वाहनांवर कारवाई करून मोठ्या माफियांना संरक्षण दिले जात असल्याचा आरोपही त्यांनी केला.

दैनिक
# राज्य लोकतंत्र
शनिवार दि.१८ जुलै २०२६


# बीड-नगर हायवेवरील वृक्षसंवर्धनाचा बोजवारा; पाण्याअभावी झाडे मृत्यूच्या उंबरठ्यावर

## झाडे लावली, पण जगवली नाहीत; ठेकेदाराच्या कामावर प्रश्नचिन्ह, लाखोंचा खर्च, पण झाडे वाळली; वृक्षसंवर्धनाचा फज्जा

बीड । प्रतिनिधी

शहरातील नगर हायवेवरील दुभाजक तसेच रस्त्याच्या दोन्ही बाजूंना पर्यावरण संवर्धनाच्या उद्देशाने मोठ्या प्रमाणावर झाडे लावण्यात आली होती. मात्र लागवड करून वर्षभर पूर्ण होण्याआधीच या झाडांची अत्यंत दयनीय अवस्था झाली असून अनेक झाडे पाण्याअभावी पूर्णपणे वाळली आहेत, तर उर्वरित झाडे सुकून माना टाकताना दिसत आहेत.

प्रत्यक्ष पाहणी केल्यास अनेक झाडांवर एकही हिरवे पान शिल्लक नसल्याचे दिसते. काही झाडे केवळ खोडाच्या स्वरूपात उभी आहेत, तर काही झाडे शेवटचा श्वास घेत असल्यासारखी दिसत आहेत.

झाडांच्या संरक्षणासाठी जाळी लावण्यात आली; परंतु नियमित पाणी देण्याची आणि देखभाल करण्याची जबाबदारी मात्र कुणीच पार पाडली नसल्याचे चित्र आहे.

नगर हायवेच्या कामाचा ठेका ज्या गुत्तेदार अथवा कंपनीकडे आहे, त्यांच्याकडे या झाडांच्या देखभालीची जबाबदारी असल्याचे सांगितले जाते. तरीही झाडांना नियमित पाणी देण्यात आले नाही का? देखभालीवर खर्च दाखवला गेला का? याची चौकशी होणे आवश्यक असल्याची मागणी नागरिकांकडून होत आहे.

विशेष म्हणजे, रस्त्याचे सुशोभीकरण आणि हरित पट्टा निर्माण करण्यासाठी लाखो रुपये खर्च करून झाडे लावली जातात. मात्र त्यांचे संगोपन न झाल्यामुळे हा संपूर्ण खर्च वाया जात आहे. एकीकडे शासन झाडे लावा, झाडे जगवाचा संदेश देत असताना दुसरीकडे सार्वजनिक पैशातून लावलेली झाडे पाण्याविना मरत असल्याचे वास्तव चिंताजनक आहे.

स्थानिक नागरिकांनी संबंधित सार्वजनिक बांधकाम विभाग, राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण तसेच संबंधित ठेकेदार कंपनीने तातडीने पाहणी करून उर्वरित झाडे वाचवावीत, मृत झालेल्या झाडांच्या जागी नवीन झाडे लावावीत आणि दोषी अधिकारी व संबंधित गुत्तेदारांची जबाबदारी निश्चित करावी, अशी मागणी केली आहे.





झाडे लावणे ही केवळ औपचारिकता नसून ती जगवण्याची जबाबदारीही तितकीच महत्त्वाची आहे. बीड नगर हायवेवरील दुभाजक आणि रस्त्यालगत लावलेली अनेक झाडे पाण्याअभावी वाळताना दिसत आहेत. हे अत्यंत दुर्दैवी आणि प्रशासनाच्या दुर्लक्षाचे उदाहरण आहे. शासनाच्या पैशातून झाडे लावली जातात, पण त्यांची नियमित देखभाल, पाणी आणि संरक्षण केले जात नसेल तर हा सार्वजनिक निधीचा अपव्यय आहे. संबंधित ठेकेदार कंपनी, कामाची देखरेख करणारा विभाग आणि संबंधित अधिकाऱ्यांनी याची तातडीने दखल घ्यावी. झाडे वाळण्यामागील कारणांची चौकशी करून जबाबदारी निश्चित करावी. ज्या झाडांचा मृत्यू झाला आहे, त्या जागी नवीन झाडे लावून त्यांचे किमान तीन वर्षे नियमित संगोपन करण्याची व्यवस्था करावी.पर्यावरण वाचवायचे असेल तर केवळ वृक्षारोपणाचे फोटो काढून चालणार नाही, तर प्रत्येक झाड जिवंत राहील याची जबाबदारी स्वीकारावी लागेल. अन्यथा 'झाडे लावा, झाडे जगवा' हा केवळ घोषवाक्यापुरताच मर्यादित राहील.

–रामनाथ खोड

# पिकांची माना टाकायला सुरुवात,तलावही कोरडाच पिके वाचवण्यासाठी शेतकऱ्यांना मोठ्या पावसाची प्रतीक्षा

### पशू-पक्ष्यांची पाण्यासाठी भटकंती, चारा-पाण्यासाठी शेतकरी हतबल

माजलगाव । प्रतिनिधी

जुलै महिना अर्ध्यापर्यंत आला तरी यंदा वरुणराजाने कृपादृष्टी दाखवली नाही. त्यामुळे माजलगाव तालुक्यातील गाव तलाव अद्यापही कोरडेच राहिले आहेत.पावसाचे प्रमाण अत्यल्प असल्याने शेतशिवार हिरवागार दिसण्या ऐवजी ओसाड दिसू लागला आहे. त्यामुळे जनावरांच्या चाऱ्यासह पिण्याच्या पाण्याचाही





ज्वलंत प्रश्न शेतकऱ्यांना भेडसावत आहे.

दुसरीकडे,हजारो खर्च करून पेरणी केलेल्या उगवत्या पिकांना वाढीसाठी पाण्या अभावी फटका बसत आहे. तापमानवाढीमुळे जमिनीतील बाष्पीभवन वाढत आहे.विशेषतः सोयाबीन व कापसाच्या कोवळ्या तर पिकांनी माना टाकायला सुरुवात केली आहे.त्यामुळे येत्या दोन दिवसांत पाऊस नाही पडला तर पिकांवर नांगर फिरवण्याशिवाय पर्याय राहणार नाही,अशी उद्विग्न भावना शेतकरी व्यक्त करीत आहेत.

माजलगाव तालुक्यातील बहुतांश भाग शेतीप्रधान आहे. सिंचनाचे क्षेत्र बऱ्यापैकी आहे. त्यामुळे या भागातील प्रयोगशील शेतकऱ्यांची संख्यादेखील मोठी आहे.परंतु पान ३ वर

# अंबाजोगाईतील पालखी सोहळ्यात चोरी झालेले सहा लाखांचे सोन्याचे दागिने एलसीबीने केले हस्तगत

बीड । प्रतिनिधी

अंबाजोगाई येथे नुकत्याच पार पडलेल्या गजानन महाराज पालखी सोहळयादरम्यान भाविकांच्या गर्दीचा फायदा घेत चोरीला गेलेले सहा लाख रुपये किमतीचे सोन्याचे दागिने बीड स्थानिक गुन्हे शाखेने शोधून काढले आहेत. पोलिसांनी या प्रकरणी तिघांना ताब्यात घेतले असून, दोन गुन्हे उघडकीस आणले आहेत.

दिनांक १० जुलै २०२६ रोजी अंबाजोगाई शहरात गजानन महाराज पालखी सोहळा मोठ्या उत्साहात पार पडला. या सोहळ्यासाठी भाविकांची मोठी



गर्दी जमली होती. या गर्दीचा गैरफायदा घेत काही चोरट्यांनी महिलांच्या गळ्यातील सोन्याच्या दागिन्यांवर डल्ला मारला होता. याप्रकरणी अंबाजोगाई शहर पोलीस ठाण्यात दोन स्वतंत्र गुन्हे दाखल करण्यात आले होते.

पोलिसांची धडाकेबाज कामगिरी

दाखल गुन्ह्यांचा समांतर तपास स्थानिक गुन्हे शाखा, बीड यांच्या पथकाने तातडीने सुरू केला. गोपनीय माहिती आणि तांत्रिक तपासणीच्या आधारे पोलिसांनी संशयितांना ताब्यात घेतले. त्यांच्याकडे केलेल्या चौकशीत चोरीची कबुली देण्यात आली.

गुन्हा क्र. २९०/२०२६: या प्रकरणात विशाल संजय हातागळे (वय २८) आणि दत्ता विजय गायकवाड (वय २६, दोघेही रा. गांधीनगर, बीड) या दोघांकडून ४८ ग्रॅम वजनाची सोन्याची चैन जप्त करण्यात आली.

गुन्हा क्र. २९३/२०२६: या प्रकरणात अशोक बबन जाधव (वय २९, रा. शास्त्रीनगर, बीड) याच्याकडून ११ ग्रॅम वजनाचे सोन्याचे मिनी गंठण हस्तगत करण्यात आले.अशाप्रकारे एकूण ५९ ग्रॅम वजनाचे, सुमारे सहा लाख रुपये किमतीचे पान ३ वर

# सोनम वांगचुक यांच्या समर्थनार्थ एकदिवसीय उपोषण; पत्रकार परमेश्वर गित्ते यांचा पुढाकार

अंबाजोगाई । प्रतिनिधी

देशातील प्रसिद्ध अभियंता, पर्यावरणवादी आणि गांधीवादी नेते सोनम वांगचुक यांनी नवी दिल्ली येथील जंतर-मंतर मैदानावर विविध मागण्यांसाठी सुरू केलेल्या अमरण उपोषणाच्या समर्थनार्थ अंबाजोगाई येथे (शुक्रवार, दि. १७ जुलै २०२६) एकदिवसीय लाक्षणिक उपोषण सुरु करण्यात आले. हे उपोषण सकाळी ११ ते सायंकाळी ५ वाजेपर्यंत उपजिल्हाधिकारी कार्यालयासमोर सुरुच होते.

यावेळी बोलताना गित्ते



म्हणाले की, शिक्षण, आरोग्य आणि लोककल्याणाच्या विविध प्रश्नांवर केंद्र सरकारची भूमिका अपुरी ठरत असल्याची भावना नागरिकांमध्ये निर्माण झाली आहे. भ्रष्टाचार आणि संवेदनशून्यतेमुळे अनेक गंभीर प्रश्न अधिक बिकट होत असून, अशा परिस्थितीत समाजाने माणुसकीच्या भावनेतून अन्यायाविरोधात पान ३ वर

# कडा कृउबा समितीचे कर्मचारी अंजाबापू हंबर्डे यांचे हृदयविकाराने निधन

आष्टी । प्रतिनिधी

कडा कृषी उत्पन्न बाजार समिती, उपपेठ आष्टी येथील कार्यरत कर्मचारी अंजाबापू कोंडीबा हंबर्डे (वय ६५) यांचे आज हृदयविकाराच्या तीव्र झटक्याने निधन झाले.आष्टी परिसरात ते 'हंबर्डे मामा' म्हणून सर्वपरिचित होते. त्यांच्या अचानक जाण्याने कृषी उत्पन्न बाजार समितीसह आष्टी व कडा परिसरात हळहळ व्यक्त होत आहे.हंबर्डे मामा यांनी आपल्या सेवेच्या माध्यमातून बाजार समितीमध्ये आणि शेतकरी वर्गात सलोख्याचे संबंध निर्माण केले होते. मनमिळावू आणि कार्यतत्पर कर्मचारी म्हणून त्यांची ओळख होती. त्यांच्या



निधनामुळे हंबर्डे कुटुंबासह मित्रपरिवारावर शोककळा पसरली आहे.त्यांच्या पार्थिवावर आज, शुक्रवार दि.१७ जुलै रोजी रात्री ९ वाजता आष्टी येथील बस स्थानकाजवळील स्मशानभूमीत अंत्यविधी पार पडला.त्यांच्या पश्चात अशोक हंबर्डे आणि अमोल हंबर्डे हे दोन मुले आणि एक मुलगी,पत्नी आणि नातवंडे असा परिवार आहे.

# परळी, अंबाजोगाईत ना. पंकजाताई मुंडेंचा हाऊसफुल्ल 'जनता दरबार'

## फेस टू फेस संवादाने जनता खुश; लोकांच्या समस्यांचा तात्काळ निपटारा

परळी वैजनाथ । प्रतिनिधी

राज्याच्या पर्यावरण व पशुसंवर्धन मंत्री ना.पंकजाताई मुंडे यांचा काल परळी व आज अंबाजोगाईत हाऊसफुल्ल 'जनता दरबार' झाला. समोरासमोर भेट होत असल्याने आणि प्रश्न लगेच मार्गी लागल्याने जनता खुश होत आहे.

काल परळीतील शासकीय विश्रामगृह आणि आज अंबाजोगाईतील जनसंपर्क कार्यालयात पान ३ वर



# अमरसिंह पंडित यांच्या हस्ते रामनगर तांड्यावर शाळा व अंगणवाडीच्या नव्या इमारतींचे लोकार्पण

गेवराई । प्रतिनिधी

शिक्षणाच्या पायाभूत सुविधा अधिक सक्षम करण्याच्या उद्देशाने कुंभेजळगाव अंतर्गत रामनगर तांडा येथे नव्याने उभारण्यात आलेल्या शाळेच्या वर्गखोली व अंगणवाडी इमारतीचा लोकार्पण सोहळा माजी आमदार तथा राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे प्रदेश सरचिटणीस अमरसिंह पंडित यांच्या शुभहस्ते आणि मान्यवरांच्या प्रमुख उपस्थितीत उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला.




यावेळी ग्रामस्थांच्या वतीने अमरसिंह पंडित यांच्यासह उपस्थित मान्यवरांचा शाल, श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन यथोचित सत्कार करण्यात आला. नव्या शाळा वर्गखोली व अंगणवाडी इमारतीमुळे रामनगर तांड्यातील विद्यार्थ्यांना दर्जेदार शैक्षणिक सुविधा उपलब्ध होणार असून, लहान बालकांच्या सर्वांगीण विकासालाही चालना मिळणार असल्याची भावना उपस्थितांनी व्यक्त केली.

कार्यक्रमास गेवराई खरेदी-विक्री संघाचे चेअरमन जयदीप औटी, माजी पंचायत समिती सदस्य हिंमतराव खरात, माजी जिल्हा परिषद सदस्य फुलचंद बोरकर, राष्ट्रवादी काँग्रेसचे शहराध्यक्ष पान ३ वर

# गरीबाच्या बालाजीच्या दर्शनासाठी वारकऱ्यांचे भक्तिमय प्रस्थान; तवलवाडी फाटा येथे दिंडींचे जल्लोषात स्वागत व महाप्रसाद

आष्टी । प्रतिनिधी

आषाढी वारीच्या पार्श्वभूमीवर गरीबाचा बालाजी म्हणून ओळखल्या जाणाऱ्या पंढरपूरच्या श्री विठ्ठल-रुक्मिणीच्या दर्शनासाठी राज्याच्या कानाकोपऱ्यातून पायी दिंड्यांचे भक्तिभावाने प्रस्थान सुरू आहे. विठ्ठलनामाच्या अखंड गजरात आणि टाळ-मृदुंगाच्या निनादात वारकरी पंढरीच्या दिशेने मार्गक्रमण करत असून सर्वत्र भक्तिमय वातावरण निर्माण झाले आहे.

आष्टी शहरातील तवलवाडी फाटा, बेलेश्वर नगर येथे स्वर्गीय विठ्ठलराव रेडेकर गुरुजी व प्रगतिशील शेतकरी स्वर्गीय कोंडीबा बापू रेडेकर यांच्या निवासस्थानी दरवर्षीप्रमाणे



यंदाही विविध दिंड्यांसाठी महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले. श्रीक्षेत्र हनुमान टाकळी (जि. अहिल्यानगर), कुकाणा तसेच परिसरातील विविध गावांतील दिंड्या या ठिकाणी विसावा घेत महाप्रसादाचा लाभ घेतात.

मज आस लागली विठुरायाच्या दर्शनाची ही भावना हृदयात बाळगून प्रत्येक वारकरी विठ्ठलनामाचा गजर करीत पंढरीच्या दिशेने निघाल्याचे भावपूर्ण चित्र यावेळी पाहायला मिळाले. हनुमान टाकळी येथील दगड-खैर परिवार, सानप परिवार, उगले महाराज तसेच ग्रामस्थ मोठ्या श्रद्धा व भक्तिभावाने श्री विठ्ठलाच्या दर्शनासाठी पायी वारीला रवाना झाले.

यावेळी स्वर्गीय विठ्ठलराव रेडेकर गुरुजी यांचे चिरंजीव राम रेडेकर, लक्ष्मण रेडेकर व शरद रेडेकर यांनी हनुमान टाकळी येथील दिंडीतील वारकऱ्यांना प्रेमपूर्वक महाप्रसादाचे वाटप केले. तसेच स्वर्गीय कोंडीबा बापू रेडेकर यांचे चिरंजीव ज्योतिबा रेडेकर, कैलास रेडेकर व तान्हाजी रेडेकर यांनीही चार ते पाच दिंड्यांतील वारकऱ्यांसाठी पान ३ वर

# जिल्हाधिकारी जॉन्सन यांनी घेतला महसूल अधिकाऱ्यांच्या कामकाजाचा आढावा

## कामकाजात पारदर्शकता आणा, महसूल अधिकाऱ्यांना कडक निर्देश, खाजगी व्यक्तींचा हस्तक्षेप खपवून घेणार नाही

बीड । प्रतिनिधी

जिल्ह्यातील महसूल प्रशासन अधिक जनहिताभिमुख, पारदर्शक आणि उत्तरदायी बनविण्यासाठी जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी कंबर कसली आहे. जिल्हा नियोजन सभागृहात आयोजित एका विशेष बैठकीत त्यांनी जिल्ह्यातील सर्व महसूल अधिकाऱ्यांच्या कामकाजाचा सविस्तर आढावा घेतला. याप्रसंगी अपर जिल्हाधिकारी हरिष धार्मिक, आश्विनी सोनावणे, निवासी उपजिल्हाधिकारी सतिश सोनी यांच्यासह जिल्ह्यातील सर्व उपजिल्हाधिकारी, उपविभागीय



अधिकारी व तहसीलदार आदि उपस्थित होते.

गावपातळीवरील समन्वय अधिक प्रभावी करण्याच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण सूचना दिल्या. तसेच नागरिकांना केंद्रबिंदू मानून प्रशासनाने अधिक गतिमानतेने काम करण्याचे निर्देश त्यांनी दिले. कार्यालयीन कामकाजात कोणत्याही खाजगी व्यक्तीचा हस्तक्षेप खपवून घेतला जाणार नाही, असा दम जिल्हाधिकाऱ्यांनी यावेळी दिला. शासकीय कामात वापरले जाणारे युजर आयडी आणि डिजिटल स्वाक्षरी कोणत्याही परिस्थितीत खाजगी व्यक्तींच्या हाती देवू नये, अन्यथा संबंधित अधिकाऱ्यांवर थेट कायदेशीर कारवाई केली जाईल, असा इशारा त्यांनी दिला. यासोबतच, नागरिकांकडून शासनाने निश्चित केलेल्या शुल्काव्यतिरिक्त कोणतेही अतिरिक्त शुल्क आकारले जाणार नाही याची काटेकोर अंमलबजावणी करण्याचे आदेश देण्यात आले. तसेच क्षेत्रीय कर्मचाऱ्यांनी आपल्या कार्यक्षेत्रात अवैध गौण खनिज उत्खनन आणि वाहतुकीवर प्रभावी नियंत्रण ठेवून दंडात्मक वसुलीचा वेग वाढवावा, असेही सांगितले.

यावेळी जिल्ह्यातील विविध महत्त्वपूर्ण पान ३ वर

# सोनम वांगचुक यांच्या उपोषणाला बीडमध्ये पाठींबा; जिल्हाधिकारी कार्यालयासमोर निदर्शने

बीड । प्रतिनिधी

शिक्षणतज्ज्ञ, संशोधक आणि पर्यावरणवादी नेते सोनम वांगचुक यांनी नीट परीक्षेतील कथित पेपरफुटी, शिक्षण क्षेत्रातील गोंधळ आणि पारदर्शक परीक्षा व्यवस्थेच्या मागण्यांसाठी दिल्लीतील जंतरमंतर येथे सुरू केलेल्या आमरण उपोषणाला पाठिंबा देण्यासाठी गुरुवारी (दि.१६) सकाळी साडेबारा वाजता बीड जिल्हाधिकारी कार्यालयासमोर निदर्शने करण्यात आली. आंदोलनादरम्यान केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी नैतिक जबाबदारी स्वीकारून तातडीने राजीनामा द्यावा,




अशी मागणी करण्यात आली.

आंदोलनकर्त्यांनी सोनम वांगचुक जिंदाबाद, सोनम वांगचुक आगे बढो, हम तुम्हारे साथ हैं, धर्मेंद्र प्रधान राजीनामा द्या, केंद्र सरकार मुर्दाबाद अशा घोषणा देत शिक्षण व्यवस्थेतील त्रुटींविरोधात निषेध व्यक्त केला.या आंदोलनानंतर जिल्हाधिकारी, बीड यांच्या मार्फत राष्ट्रपती, सर्वोच्च न्यायालयाचे मुख्य न्यायमूर्ती, पंतप्रधान, केंद्रीय गृहमंत्री अमित शाह, राज्यपाल जिष्णु देव वर्मा आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना निवेदन पाठविण्यात आले.

This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Subhash vilasrao choure. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड-४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक-सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक - सुभाष विलासराव चौरे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल - rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26